**RNI No. MAHBIL /2009/35530**

**Reg. No. MH/MR/South-341/2011–13**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

**वर्ष ४, अंक ३०]** **गुरुवार, फेब्रुवारी १४, २०१३/माघ २५, शके १९३४** **[पृष्ठे ४२, किंमत : रुपये १५.००**

**असाधारण क्रमांक ४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.—**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. | पृष्ठ १-४२ |

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.

दिनांक १४ फेब्रुवारी २०१३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2013.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६१ चा महा.२४. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद

२१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९६१ चा महा. २४.

(क) खंड (२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (२-क) "प्राधिकृत व्यक्ती" याचा अर्थ, अनुच्छेद २४३यथ मध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कार्यवाही करण्यासाठी निबंधकाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;";

(ख) खंड (७) मध्ये, "संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन, ज्या व्यवस्थापन समितीकडे किंवा संचालक मंडळाकडे किंवा कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या अन्य निदेशन निकायाकडे सोपविण्यात आले असेल, ती समिती किंवा तो निकाय", या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" जिच्याकडे संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आले असेल अशी त्या सहकारी संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा संचालक मंडळ किंवा नियामक मंडळ किंवा अन्य निदेशन निकाय—मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो;,";

(ग) खंड (१०-ख) वगळण्यात येईल;

(घ) खंड (११) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (११-क) "तज्ज्ञ संचालक" याचा अर्थ, बँकिंग, व्यवस्थापन, वित्तव्यवस्था या क्षेत्रांमधील अनुभव असलेली व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये, संबंधित संस्थेने हाती घेतलेली उद्दिष्टे व कार्ये यांच्याशी संबंधित अन्य कोणत्याही क्षेत्रातील विशेषज्ञता धारण करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो ;" ;

(ङ) खंड (१४) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(१४-क) "कार्यलक्ष्यी संचालक" याचा अर्थ, व्यवस्थापन संचालक किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी- मग तो कोणत्याही पदनामाने संबोधण्यात येवो-, असा आहे आणि त्यामध्ये, समितीने नामनिर्देशित केलेल्या, संबंधित संस्थेच्या कोणत्याही विभागाच्या प्रमुखाचा समावेश होतो ;" ;

(च) खंड (१९) मध्ये,—

(एक) उपखंड (क)मधील, "सहयोगी सदस्य किंवा हितैषी सदस्य" या मजकुराऐवजी "किंवा सहयोगी सदस्य" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उपखंड (क) नंतर, पुढील उपखंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-१) "क्रियाशील सदस्य" याचा अर्थ, जो संस्थेच्या कारभारात भाग घेतो आणि उपविधींमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा संस्थेच्या सेवांचा किंवा साधनांचा किमान मर्यादेत वापर करतो असा सदस्य, असा आहे ;" ;

(तीन) उपखंड (घ) वगळण्यात येईल ;

(छ) खंड (२०) मध्ये,"सभापती, उप सभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापक, सचिव, कोषपाल, समितीचा सदस्य आणि अशा संस्थेच्या कामकाजासंबंधी निदेश देण्यासाठी या अधिनियमांन्वये,

नियमांन्वये किंवा उपविधींन्वये निवडून दिलेली किंवा नेमणूक केलेली इतर कोणतीही व्यक्ती ;" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"कार्याध्यक्ष, उप-कार्याध्यक्ष, अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापक, सचिव, कोषपाल, समितीचा सदस्य आणि अशा संस्थेच्या कामकाजासंबंधी निदेश देण्यासाठीया अधिनियमान्वये, नियमांन्वये किंवा उपविधींन्वये निवडून दिलेली किंवा नेमणूक केलेली इतर कोणतीही व्यक्ती- मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो-, यांसारखा कोणताही पदाधिकारी ;";

(ज) खंड (२७) मध्ये, "या अधिनियमान्वये" या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" संयुक्त मालकी आणि लोकशाही नियंत्रण असलेल्या उपक्रमाद्वारे आपल्या समाईक गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि सहकार तत्त्वांचे आणि मूल्यांचे अनुसरण करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तींचा स्वायत्त अधिसंघ असलेली संस्था, असा आहे" ;

(झ) खंड (२९) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (२९-क) "राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण" याचा अर्थ, राज्य शासनाने कलम ७३गख अन्वये घटित केलेले प्राधिकरण, असा आहे ;".

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३अ मध्ये, खंड (क) मधील, "निबंधकाच्या बाबतीत निबंधकाच्या कार्यालयातील" या मजकुरानंतर, "विशेष," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ३अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (१) मधील दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६ ची सुधारणा.

"परंतु तसेच, निबंधकास, संस्थांच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या नोंदणीसाठी मानके व शर्ती विनिर्दिष्ट करता येतील.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मधील, पोट-कलम (१) चे परंतुक वगळण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, "आवश्यक किंवा इष्ट आहे" या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" किंवा संस्थेचे कोणतेही उपविधी या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा नियमांशी विसंगत आहेत आणि म्हणून त्या उपविधींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे,";

(ख) पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

"परंतु, अशी अधिसूचित राज्य संघीय संस्था, पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, अशा राज्य संघीय संस्थेचा त्या सुधारणेस कोणताही आक्षेप नाही असे गृहित धरण्यात येईल आणि त्यानुसार निबंधकास पुढील कार्यवाही सुरू करण्याची मोकळीक राहील :

परंतु, आणखी असे की, निबंधकास, त्याला योग्य वाटेल अशा प्रकारच्या संस्थांसाठी किंवा संस्थांच्या वर्गासाठी आदर्श उपविधी विनिर्दिष्ट करता येतील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १७ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये, पोट-कलम (१) मधील परंतुकानंतर,पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, बँकिंग व्यवसाय करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत, असे कोणतेही एकत्रीकरण, हस्तांतरण, विभागणी किंवा रूपांतर, भारतीय रिझर्व बँकेच्या पूर्वमान्यतेशिवाय करण्यात येणार नाही.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये , -

(एक) "सार्वजनिक हिताच्या दृष्टीने" या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"किंवा अशा संस्थांच्या सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने";

(दोन) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, अशी अधिसूचित राज्य संघीय संस्था, पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, अशा संघीय संस्थेचा त्या सुधारणेस कोणताही आक्षेप नाही असे गृहित धरण्यात येईलआणि त्यानुसार निबंधकास पुढील कार्यवाही सुरू करण्याची मोकळीक राहील." ;

(ख) समासटीपेऐवजी, पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

"सार्वजनिक हिताच्या दृष्टीने किंवा सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने एकत्रीकरण, विभागणी व पुनर्रचना करण्यासाठी निदेश देण्याचा अधिकार.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १८अ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८अ मध्ये ,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, अशी अधिसूचित राज्य संघीय संस्था किंवा अन्य प्राधिकरण, पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, अशा अधिसूचित संघीय संस्थेचा किंवा अन्य प्राधिकरणाचा एकत्रीकरण योजनेस कोणताही आक्षेप नाही, असे गृहित धरण्यात येईल आणि त्यानुसार निबंधकास, पुढील कार्यवाही सुरू करण्याची मोकळीक राहील.";

(ख) पोट-कलम (२) मध्ये, खंड (ब) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"(क) निबंधक, भारतीय रिझर्व बँकेची पूर्वमान्यता घेईल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १८ब ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ ब मधील पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, अशी अधिसूचित राज्य संघीय संस्था किंवा अन्य प्राधिकारी, पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, अशा अधिसूचित संघीय संस्थेचा किंवा अन्य प्राधिकरणाचा एकत्रीकरण योजनेस कोणताही आक्षेप नाही, असे गृहित धरण्यात येईल आणि त्यानुसार निबंधकास, पुढील कार्यवाही सुरू करण्याची मोकळीक राहील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १८क ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८क मधील पोट-कलम (२) मध्ये,—

(क) खंड (ई) मधील, " एका प्रशासकाची किंवा अंतरिम व्यवस्थापन समितीची नेमणूक करणे." या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"एका प्राधिकृत अधिकाऱ्याची किंवा त्या संस्थेच्या क्रियाशील सदस्यांमधून एका अंतरिम व्यवस्थापन समितीची नेमणूक करणे.";

(ख) दोन्ही परंतुके वगळण्यात येतील.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम २३ मधील, पोट-कलम (२) मध्ये, "निबंधकाकडे अपील करता येईल" या मजकुराच्या अगोदर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २३ ची सुधारणा.

"त्या संस्थेच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत".

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २४ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये, "नाममात्र सदस्य, सहयोगी सदस्य किंवा हितैषी सदस्य" या मजकुराऐवजी "नाममात्र सदस्य किंवा सहयोगी सदस्य" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, "किंवा हितैषी सदस्यास" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे तो वगळण्यात येईल ;

(ग) समासटीपेऐवजी, पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

"नाममात्र सदस्य व सहयोगी सदस्य.".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये कलम २४ क समाविष्ट करणे.

"**२४क**. (१) प्रत्येक संस्था, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, राज्य संघीय संस्थांमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांमार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील. अशा शिक्षणामुळे व प्रशिक्षणामुळे— सदस्य इत्यादींना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे.

(एक) संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये सदस्यांचा प्रभावी व सक्रीय सहभाग सुनिश्चित होईल ;

(दोन) नेतृत्व कार्यासाठी बुद्धिवान कर्मचारी शिकून कुशल बनतील ;

(तीन) सहकार शिक्षण व प्रशिक्षण यांमुळे व्यावसायिक कौशल्य विकसित होईल.

(२) निवडून आलेला किंवा स्वीकृत केलेला समितीचा प्रत्येक सदस्य, विहित करण्यात येईल, असे सहकार शिक्षण व प्रशिक्षण, अशा कालावधीकरिता आणि अशा कालांतराने घेईल.

(३) प्रत्येक संस्था, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या, राज्य संघीय संस्थांच्या किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षण व प्रशिक्षण निधीत विहित करण्यात येईल अशा दराने दरवर्षी अंशदान करील, आणि वेगवेगळ्या संस्थांकरिता किंवा संस्थांच्या वर्गांकरिता वेगवेगळे दर विहित करण्यात येतील.".

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २६ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २६ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

"**२६.** (१) कोणताही सदस्य, अधिनियमात, नियमांत आणि उपविधींमध्ये तरतूद केली असेल अशा हक्कांचा वापर करण्यास हक्कदार असेल : सदस्यांचे हक्क व कर्तव्ये.

परंतु, कोणत्याही सदस्यास, त्याने सदस्यत्वाबाबत वेळोवेळी संस्थेच्या उपविधींन्वये विहित करण्यात येईल आणि विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम संस्थेला चुकती करीपर्यंत किंवा संस्थेत असा हितसंबंध संपादन करीपर्यंत, अशा हक्कांचा वापर करणार नाही :

परंतु आणखी असे की, सदस्यत्वाच्या हक्काचा वापर करण्यासाठी भाग भांडवलातील सदस्याच्या किमान अंशदानात वाढ केल्यास, संस्था, सदस्यांना यथोचित मागणीची नोटीस देईल आणि अनुपालन करण्यासाठी वाजवी कालावधी देईल.

(२) संस्थेच्या प्रत्येक सदस्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(क) लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत सर्व सदस्य मंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणे,

(ख) संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणे :

परंतु, जो सदस्य वरीलप्रमाणे लागोपाठ पाच वर्षांच्या कालावधीत अधिमंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, लागोपाठच्या पाच वर्षांच्या कालावधीत किमान एकदा सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही, अशा कोणत्याही सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, जेव्हा संस्था एखाद्या सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करील तेव्हा, ती संस्था, वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित सदस्याला अशा वर्गीकरणाबाबत विहित रीतीने कळवील :

परंतु असेही की, जो अक्रियाशील सदस्य असे त्याचे वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षांमध्ये, सर्व सदस्य मंडळाच्या निदान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवांचा किमान मर्यादेत वापर करणार नाही असा कोणतही अक्रियाशील सदस्य कलम ३५ अन्वये त्याला काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल :

परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केलेल्या सदस्याने, या पोट-कलमाच्या खंड(क) व (ख) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पात्रता निकषांची पूर्तता केल्यावर, तो क्रियाशील सदस्य म्हणून त्याचे पुनःवर्गीकरण केले जाण्यास हक्कदार होईल :

परंतु असेही की, एखादा सदस्य क्रियाशील किंवा अक्रियाशील सदस्य असण्याबाबत वाद उदभवल्यास, असे वर्गीकरण केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे त्याबाबत अपील करण्यात येईल :

परंतु असेही की, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३ याच्या प्रारंभाच्या लगतनंतर घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत, त्या संस्थेचे सर्व विद्यमान सदस्य, त्यांना मतदान करण्यासाठी अन्यथा अपात्र घोषित केले नसेल तर, मतदान करण्यासाठी पात्र ठरतील.”. २०१३ चा महा. अध्या. २.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील पहिल्या परंतुकानंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :-

“**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी “नामिकेतील एकापेक्षा अधिक उमेदवारांस मते दिल्यास”, ते एकच मत असल्याचे समजले जाईल.” ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

“(१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जो क्रियाशील सदस्य त्यानंतर संस्थेच्या कामकाजात सहभागी होण्यात आणि वेळोवेळी उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किमान मर्यादेपर्यंत सेवांचा वापर करण्यात कसूर करील तो सदस्य क्रियाशील सदस्य असण्याचे बंद होईल आणि तो मतदान करण्यास हक्कदार असणार नाही.” ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये, “आपल्या सदस्यांपैकी कोणत्याही एका” या मजकुरानंतर “क्रियाशील” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (८) मधील, “किंवा हितैषी” हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (१०) मधील, “कृषी पत संस्थेच्या बाबतीत” या मजकुराने सुरू होणारा व “कोणताही हक्क असणार नाही :” या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-

“एखाद्या सदस्याने संस्थेकडून कर्ज घेतले असेल तर, असा सदस्य ज्या ज्यावेळी तो कसूरदार ठरेल त्या त्यावेळी त्यास कलम ७३गक च्या पोट-कलम (१) च्या खंड (एक) च्या स्पष्टीकरणात तरतूद केल्याप्रमाणे, संस्थेच्या कामकाजात मत देण्याचा कोणताही हक्क असणार नाही :”;

(च) पोट-कलम (१२) वगळण्यात येईल.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये,—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, परंतुकामध्ये, "भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी" या मजकुराऐवजी, "भारतीय रिझर्व बँकेच्या किंवा राष्ट्रीय बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) पहिल्या परंतुकातील, "भाग भांडवल, कर्ज" या मजकुरानंतर "अर्थसहाय्य" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकातील, "भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी" या मजकुराऐवजी, "भारतीय रिझर्व बँकेच्या किंवा राष्ट्रीय बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ च्या पोट-कलम (३) मधील, दुसऱ्या परंतुकामध्ये, "भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी" या मजकुराऐवजी, "भारतीय रिझर्व बँकेच्या किंवा राष्ट्रीय बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४अ मध्ये,—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ४४अ ची सुधारणा.

(क) "तीन हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "दहा हजार रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) "किंवा वाणिज्यिक" हा मजकूर वगळण्यात येईल.

**२०.** मुख्य अधिनियमाचे कलम ६८ वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ६८ वगळणे.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ मध्ये, "कलम ६८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शिक्षण निधीसाठी" या मजकुराऐवजी, "कलम २४क मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सहकार शिक्षण व प्रशिक्षण यासाठी निधी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ६९ ची सुधारणा.

**२२.** मुख्य अधिनियमाचे कलम ६९क वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ६९क वगळणे.

**२३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७० मध्ये,—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७० ची सुधारणा.

(क) "सहकारी पत संरचना संस्थेखेरीज इतर प्रत्येक संस्था," या मजकुराऐवजी, "संस्था," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) मागील लागोपाठ तीन वर्षांत लेखापरीक्षेत निदान "अ" वर्ग मिळालेली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा राज्य सहकारी बँक ;";

(ग) पहिल्या परंतुकापूर्वी, खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(घ) राज्य शासनाने, नियमांद्वारे, किंवा त्याबाबतीत दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी दिलेला इतर कोणताही प्रकार:".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७१-अ ची सुधारणा.

**२४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७१-अ मध्ये, पोट-कलम (१) मध्ये, "कलमे ७८, ९६ किंवा १४४-न अन्वये" या मजकुराऐवजी "कलमे ७८, ७८अ किंवा ९६ अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ ची सुधारणा.

**२५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ मधील,—

(क) पोट-कलम (१कख) मध्ये,—

(एक) "असा प्रत्येक सदस्य" या मजकुराने सुरू होणारा व "त्याचे पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल" या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामधील "सात दिवसांच्या" या मजकुराऐवजी "पंधरा दिवसांच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात येतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याची कलमे ७३ एक-अ, ७३ एक-ब आणि ७३ एक-क वगळणे.

**२६.** मुख्य अधिनियमाची कलमे ७३ एक-अ, ७३ एक-ब आणि ७३ एक-क वगळण्यात येतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ एक-घ ची सुधारणा.

**२७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ एक-घ मधील पोट-कलमे (१) व (२) यांऐवजी पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

"(१) जो अधिकारी त्या अधिकारपदावर निवडणुकीद्वारे निवडून आल्याच्या सामर्थ्याने ते अधिकारपद धारण करत असेल, त्याच्याविरुद्ध अशा अधिकाऱ्याच्या निवडणुकीच्या वेळी मतदान करण्याचा हक्क असलेल्या समितीच्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांश सदस्यांनी समितीच्या बैठकीत बहुमताने अविश्वासाचा प्रस्ताव संमत केल्यास, असा अधिकारी म्हणून असण्याचे बंद होईल आणि त्यानंतर असे अधिकारपद रिकामे झाल्याचे मानण्यात येईल.

(२) अशा कोणत्याही विशेष बैठकीसाठी पाठविण्याच्या मागणीपत्रावर समितीचा अधिकारी निवडून देण्याचा हक्क असणाऱ्या एकूण सदस्यांपैकी एक तृतीयांशाहून कमी नसतील इतके सदस्य सही करतील, आणि ते मागणीपत्र निबंधकाकडे सुपूर्द करण्यात येईल. मागणीपत्र विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने तयार करण्यात येईल :

परंतु, अशा विशेष बैठकीसाठी सादर करावयाचे कोणतेही मागणीपत्र पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही एका अधिकाऱ्याने आपले अधिकारपद धारण केल्याच्यादिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर केले जाणार नाही." .

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अ ची सुधारणा.

**२८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३अ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील "आणि कलमे ७३क, ७३ड व ७३इ" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) "निवडून आली असेल किंवा नेमली गेली असेल" या मजकुराऐवजी, "निवडून आली असेल, स्वीकृत केली असेल किंवा नेमली गेली असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) "निवडणुका किंवा नेमणुका" या मजकुराऐवजी, "निवडणुका, स्वीकृती किंवा नेमणुका" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) "फेरनिवड किंवा फेरनेमणूक" या मजकुराऐवजी, "फेरनिवड, स्वीकृत किंवा पुनर्नामनिर्दिष्ट" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (६) वगळण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"(७) एखाद्या व्यक्तीस केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या सेवेत किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा कोणत्याही निगम निकायामध्ये किंवा कोणत्याही संघटनेमध्ये अधिकारपद धारण करीत असल्याच्या सामर्थ्याने कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून निवडण्यात, स्वीकृत करून घेण्यात, नेमण्यात किंवा नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल तेव्हा, तो ज्या दिनांकास असे अधिकारपद धारण करण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून तो असा सदस्य असण्याचे बंद होईल.

(८) एखाद्या संस्थेच्या ज्या सदस्यास दुसऱ्या कोणत्याही संस्थेवर तिचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल, असा कोणताही सदस्य ती दुसरी संस्था पहिल्या संस्थेची संघीय संस्था नसेल तर, त्या इतर संस्थेचा पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास, स्वीकृत किंवा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही.

(९) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा संस्थेच्या किंवा संस्थांच्या वर्गाच्या बाबतीत कोणताही सदस्य, क्रियाशील सदस्य नसेल आणि अशा अधिसूचनेत घालून देण्यात येतील अशा आर्थिक मर्यादांपर्यंत संस्थेशी असलेल्या त्यांच्या व्यवहारासंबंधीच्या किमान शर्ती पूर्ण करीत नसेल तर, पदनिर्देशित अधिकारी म्हणून निवडून येण्यास, स्वीकृत किंवा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही.".

**२९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३अअ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये कलम ७३अअअ समाविष्ट करणे.

"**७३अअअ.** (१) उपविधींमध्ये तरतूद करण्यात येईल इतक्या सदस्य संख्येचा समितीत अंतर्भाव असेल : समितीची रचना करणे.

परंतु, समितीच्या सदस्यांची कमाल संख्या एकवीसपेक्षा अधिक असणार नाही :

१९४९ चा १०. परंतु आणखी असे की, बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ याच्या तरतुदी, बँक व्यवसाय करणाऱ्या सर्व संस्थांना लागू होतील.

(२) समितीला, संस्थेची उद्दिष्टे व तिने हाती घेतलेली कार्ये यांच्या संबंधात, "तज्ज्ञ संचालकांना" स्वीकृत करता येईल :

परंतु, तज्ज्ञ संचालकांची संख्या ही, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, समितीच्या कमाल एकवीस सदस्यांव्यतिरिक्त दोनपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु आणखी असे की, ज्या समितीमध्ये सतरापेक्षा जास्त सदस्य नसतील अशा समितीच्या बाबतीत समिती एका कार्यलक्षी संचालकाची नेमणूक करू शकेल आणि एकवीसपेक्षा जास्त सदस्य नसलेल्या समितीच्या बाबतीत, समिती नामनिर्दिष्ट करील अशा कार्यलक्षी संचालकांची संख्या दोनपेक्षा अधिक असणार नाही :

परंतु तसेच, सहकारी संस्थेचे ''कार्यलक्षी संचालक'' हे, समितीचे सदस्यदेखील असतील आणि अशा सदस्यांना, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या समितीच्या एकूण सदस्य संस्थेची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी वगळण्यात येईल :

परंतु तसेच, अशा तज्ञ संचालकांना संस्थेच्या कोणत्याही निवडणुकीत मत देण्याचा अधिकार असणार नाही आणि ते, समितीचे पदाधिकारी म्हणून निवडून दिले जाण्यास पात्र असणार नाहीत.

(३) समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा आणि तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षांपर्यंत असेल आणि पदाधिकाऱ्यांची मुदत समितीच्या मुदतीइतकीच असेल.

(४) समितीवरील नैमित्तिक रिक्त पद, ज्याच्यासंबंधात नैमित्तिक रिक्त पद निर्माण झाले असेल अशा क्रियाशील सदस्यांच्या त्याच वर्गामधून भरता येईल.

(५) (क) जर समितीच्या सदस्यांच्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीत, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर समितीची रचना झाली नसेल तर, या अधिनियमात किंवा नियमात किंवा संस्थेच्या उपविधीत काहीही अंतर्भूत असले तरी, निर्वाचन अधिकारी किंवा अशी निवडणूक घेणारा इतर कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, दोन-तृतीयांश किंवा त्याहून अधिक सदस्यांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्यांची नावे त्यांच्या कायम पत्त्यांसह निबंधकांकडे अग्रेषित करील. निबंधक, त्याला कळविण्यात आलेली नावे प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, अशी नावे व पत्ते सूचना फलकावर किंवा त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही ठळक जागी नोटीस लावून प्रसिद्ध करील किंवा प्रसिद्ध करण्याची तजवीज करील, आणि अशी नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर संस्थेच्या समितीची रितसर रचना करण्यात आली असे समजण्यात येईल. सदस्यांची दोन-तृतीयांश इतकी संख्या ठरविताना अपूर्णांकहिशेबात घेतला जाणार नाही :

परंतु, अशा रीतीने नावे व पत्ते प्रसिद्ध करण्यामुळे—

(एक) उर्वरित सदस्यांची निवडणूक पूर्ण होण्यास तसेच निवडून आलेल्या सदस्यांची नावे व कायम पत्ते वरीलप्रमाणेच जसजसे उपलब्ध होतील तसतसे प्रसिद्ध करण्यास अडथळा होतो ; किंवा

(दोन) या अधिनियमाखालील समितीच्या सदस्यांच्या पदावधीला बाधा पोहोचते ;

असे मानले जाणार नाही.

(ख) उर्वरित सदस्य निवडून आल्यानंतर त्यांची नावेही (त्यांच्या कायम पत्त्यांसह) त्यानंतर तशाच प्रकारे निबंधकाकडून प्रसिद्ध करण्यात येतील.''.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याची कलमे ७३अअ आणि ७३ अब वगळणे.

**३०.** मुख्य अधिनियमाची कलमे ७३अअ आणि ७३अब वगळण्यात येतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ब ची सुधारणा.

**३१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ब मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) ''चार जागा'' या मजकुराऐवजी ''तीन जागा'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (अ-एक) च्या शेवटी ''आणि'' हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (अ-दोन) च्या शेवटी असलेला ''आणि'' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(चार) खंड (ब) वगळण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मधील ''किंवा यथास्थिति दुर्बल गटामधील'' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

''(४) तीन राखीव जागांपैकी कोणत्याही जागेवर कोणत्याही व्यक्तीची निवड न झाल्यास अशी किंवा अशा राखीव जागा, पोट-कलम (३) अन्वये निवडणूक लढविण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींमधून, नामनिर्देशनाद्वारे, भरण्यात येतील.'';

(ङ) स्पष्टीकरणातील खंड (क) वगळण्यात येईल ;

(च) समासटीपेऐवजी, पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

'' संस्थांच्या समित्यांवर विवक्षित जागा राखून ठेवणे व त्यासाठी निवडणूक घेणे.''.

**३२.** मुख्य अधिनियमाची कलमे ७३बब आणि ७३बबब वगळण्यात येतील. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याची कलमे ७३बब आणि ७३बबब वगळणे.

**३३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३क ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३क ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

''**७३-क.** (१) हा अधिनियम, किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये, किंवा कोणत्याही संस्थेच्या उपविधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिला सदस्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सदस्य म्हणून व्यक्तींचा अंतर्भाव असणाऱ्या आणि व्यक्तींच्या अशा वर्गातील किंवा प्रवर्गातील सदस्य असणाऱ्या प्रत्येक संस्थेच्या समितीवर महिलांकरिता दोन जागा राखून ठेवण्यात येतील. महिलांकरिता जागा राखून ठेवणे.

(२) संस्थेची कोणतीही महिला सदस्य किंवा सदस्य–संस्थेच्या समितीची कोणतीही महिला सदस्य, मग ती निवडून आलेली, स्वीकृत केलेली किंवा नामनिर्दिष्ट केलेली असो, पोट-कलम (१) अन्वये, राखून ठेवण्यात आलेल्या जागेकरिता निवडणूक लढविण्यास पात्र असेल.

(३) अशा राखून ठेवण्यात आलेल्या जागांकरिता कोणतीही महिला सदस्य किंवा, यथास्थिति कोणत्याही महिला सदस्य निवडून आलेल्या नसतील त्याबाबतीत, अशी जागा किंवा अशा जागा, पोट-कलम (२) अन्वये निवडणूक लढविण्यासाठी पात्र असलेल्या महिला सदस्यांमधून स्वीकृत करून घेऊन भरण्यात येतील.

(४) केवळ महिला सदस्य असणाऱ्या संस्थेच्या समितीला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.''.

**३४.** मुख्य अधिनियमाची कलमे ७३इ व ७३इक वगळण्यात येतील. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामधील कलमे ७३इ व ७३इक वगळणे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३फफ ची सुधारणा.

**३५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३फफ ला कलम ७३गक असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशाप्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या कलम ७३गक मध्ये,—

(क) पोट-कलम (१) पूर्वी, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(क१) (क) यंत्रसामग्री, अवजारे, सामग्री, विक्रेय वस्तू किंवा इतर माल खरेदी करण्यासाठी सदस्यांना कर्ज देणाऱ्या संस्थेच्या बाबतीत किंवा अशा मालाचा धंदा करणाऱ्या संस्थेच्या बाबतीत जो सदस्य किंवा ज्यांचा निकटचा नातेवाईक अशा मालाचा विक्रेता असेल किंवा अशा मालाचा धंदा करणारा कंपनीचा संचालक किंवा अशा भागीदारी संस्थेचा भागीदार असेल, असा कोणताही सदस्य अशा संस्थेच्या समितीचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्दिष्ट होण्यास पात्र असणार नाही.

(ख) संस्थेमार्फत ज्या प्रकारचा धंदा केला जातो तोच धंदा संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही सदस्यास असा धंदा करण्याच्या परवानगीकरिता संस्थेकडे अर्ज करता येईल. संस्थेस, विहित करण्यात येईल अशा शर्तींना अधीन राहून, अशी परवानगी देता येईल." ;

(ख) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) स्पष्टीकरणामधील परिच्छेद (ङ) नंतर, पुढील परिच्छेद समाविष्ट करण्यात येईलः-

"(च) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा राज्य सहकारी बँक यांच्या बाबतीतील, सदस्य जर—

(एक) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा राज्य सहकारी बँक यांच्या मंडळावर प्राथमिक सहकारी कृषी पत संस्थेव्यतिरिक्त अन्य एखाद्या संस्थेचे प्रतिनिधित्व करत असेल ती जिचे प्रतिनिधित्व करीत असेल त्या संस्थेने जर नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरिता अशा बँकेची रक्कम प्रदान करण्याबाबत कसूर केली असेल, अशी व्यक्ती ;

(दोन) प्राथमिक सहकारी कृषी पत संस्थेचा कसूरदार असेल किंवा कसूरदार असलेल्या प्राथमिक सहकारी कृषी पत संस्थेचा एखादा पदाधिकारी असेल, अशी व्यक्ती ;

(तीन) ज्या संस्थेची व्यवस्थापन समिती निष्प्रभावित झालेली असेल अशा संस्थेचे प्रतिनिधित्व करीत असेल अशी व्यक्ती ;";

(दोन) खंड (दोन) नंतर, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

"(दोन-क) कलम २६ च्या पोट-कलम (२) अन्वये, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात आले असेल ; किंवा" ;

(तीन) खंड (पाच) मध्ये,—

(एक) "कलम ७३च च्या पोट-कलम (२) च्या" या मजकुराऐवजी, "पोट-कलम (क१) च्या खंड (ख) च्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) स्पष्टीकरण वगळण्यात येईल.

(चार) खंड (सहा) मध्ये, "अथवा कलम ७३बब खाली संस्थेच्या समितीवरील कोणत्याही राखीव जागेवर निवड होण्याचा किंवा निवडून येण्याचा" या मजकुराऐवजी, "कलम ७३अक च्या पोट-कलम (२) अन्वये, संस्थेच्या समितीवर कार्यलक्षी संचालक म्हणून नामनिर्दिष्ट करण्याचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(पाच) खंड (सात) नंतर, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(आठ) कलम १४६ अन्वये, कोणत्याही अपराधाकरिता दोषी ठरवण्यात आले असेल आणि कलम १४७ खालील अपराध सिद्ध झाला असेल तर ; किंवा

(नऊ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअन्वये एखाद्या अपराधाकरिता एक वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीच्या कारावासासाठी सिद्धापराधी ठरला असेल तर ;";

(ग) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(३) पोट-कलम (क१) आणि पोट-कलम (२) चे खंड (एक) ते (नऊ) यां अन्वये निरर्हता ओढवल्याच्या कारणाने सदस्यत्व बंद झालेला समितीचा सदस्य, ज्या दिनांकास समितीचा सदस्य म्हणून त्याचे सदस्यत्व बंद झाले असेल त्या दिनांकापासून समितीच्या पुढील पाच वर्षांच्या मुदतीचा कालावधी समाप्त होईपर्यंत समितीचा सदस्य म्हणून पुन्हा नेमणूक केली जाण्यास, पुन्हा नामनिर्दिष्ट होण्यास, पुन्हा स्वीकृत होण्यास, किंवा पुन्हा निवडून येण्यास पात्र असणार नाही.

(४) पोट-कलम (३) मध्ये निर्देश केलेल्या निरर्हतेहून अन्य कोणतीही निरर्हता ओढवल्याच्या कारणाने सदस्यत्व बंद झालेल्या समितीचा सदस्य, या अधिनियमात अन्यथा विनिर्देशपूर्वक तरतूद केलेली नसेल तर, एरव्ही, अशी निरर्हता अस्तित्वात असण्याचे बंद होताच, समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास, पात्र असेल." ;

(घ) समासटीपेऐवजी, पुढील समासटीप दाखल करण्यात येईल:—

"समितीची आणि तिच्या सदस्यांची निरर्हता.".

**३६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३गक नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये कलम ७३गख समाविष्ट करणे.

"**७३गख.** (१) संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्यासाठी व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अधीक्षण, निदेशन व नियंत्रण हे राज्य शासनाने याबाबतीत घटित केलेल्या 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्राधिकरणाकडे निहित असेल. मंडळाच्या सदस्यांची प्रत्येक सार्वत्रिक निवडणूक आणि लागू असलेल्या मर्यादेपर्यंतचे कोणतेही नैमित्तिक रिक्त पद यासह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार घेण्यात येईल. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण.

(२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामध्ये, राज्य शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नाही असे पद ज्याने धारण केले होते अशा, व्यक्तीचा राज्य सहकारी निवडणूक आयुक्त म्हणून समावेश असेल. राज्य सहकारी निवडणूक आयुक्त यांची नियुक्ती राज्यपालांकडून करण्यात येईल. राज्यसहकारी निवडणूक आयुक्त हे तीन वर्षांच्या कालावधीकरिता पद धारण करतील. तथापि त्याच्या नियुक्तीचा पदावधी दोन वर्षांने वाढविता येईल. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे कार्यालय राज्य शासन अधिसूचित करील अशा ठिकाणी असेल:

परंतु, राज्य सहकारी निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केल्यावर त्याच्या पदावरून सेवानिवृत्त होईल.

(३) राज्य शासन, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचा सचिव म्हणून अपर निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील.

(४) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य सहकारी निवडणूक आयुक्ताचे वेतन व भत्ते यांसह सेवेच्या इतर शर्ती, विहित करण्यात येतील. पोट-कलम (६) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य सहकारी निवडणूक आयुक्ताचे गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता या संबंधात राज्यपालांनी चौकशीचे आदेश दिल्यानंतर व त्यानुसार उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशाने चौकशी पार पाडल्यानंतर व आरोप

सिद्ध झाल्यानंतर राज्य सहकारी निवडणूक आयुक्तास अशा कारणाकरिता पदावरून दूर करता येईल, असे कळविल्यावर केवळ राज्यपालांच्या आदेशाद्वारे त्यांना पदावरून दूर करण्यात येईल.

(५) राज्यपालास, राज्य सहकारी निवडणूक आयुक्ताला त्याच्या पदावरून निलंबित करता येईल आणि आवश्यकता वाटल्यास, उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशाचा अहवाल प्राप्त होऊन राज्यपाल आदेश संमत करेपर्यंत पोट-कलम (४) अन्वये ज्याच्या संबंधात याबाबत चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत त्यास चौकशीदरम्यान कार्यालयात उपस्थित राहण्यास मनाईदेखील करता येईल.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहिही अंतर्भूत असले तरी राज्यपालास आदेशाद्वारे, राज्य सहकारी निवडणूक आयुक्ताला त्याच्या पदावरून दूर करता येईल, जर तो,—

(क) नादार असल्याचे न्यायनिर्णीत झाले असेल ; किंवा

(ख) राज्यपालांच्या मते नैतिक अध:पताचा समावेश असलेल्या एखाद्या अपराधासाठी त्याला अपराधसिद्ध ठरविण्यात आले असेल ; किंवा

(ग) तो त्याच्या पदावधीमध्ये त्याच्या पदाच्या कर्तव्याव्यतिरिक्त कोणत्याही वेतनी नोकरीमध्ये गुंतलेला असेल ; किंवा

(घ) राज्यपालांच्या मते तो विकल मनाच्या किंवा शारीरिक दुर्बलतेच्या कारणास्तव पद धारण करण्याचे चालू ठेवण्यास अयोग्य असेल ; किंवा

(ङ) राज्य सहकारी निवडणूक आयुक्त किंवा सदस्य म्हणून त्याच्या कार्यास बाधा पोहोचण्याचा संभव असेल असे वित्तीय किंवा इतर हितसंबंध संपादन करीत असेल.

(७) राज्य शासन, राज्य सहकारी निवडणूक आयुक्ताशी विचारविनिमय केल्यानंतर, या अधिनियमान्वये त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्यास सहाय्य करण्याकरिता, त्याच्या कार्यालयाकरिता अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची तरतूद करेल.

(८) राज्य शासन, पोट-कलम (१) द्वारे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणावर प्रदान करण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणाद्वारे जेव्हा जेव्हा विनंती करण्यात येईल, तेव्हा तेव्हा असा कर्मचारीवर्ग उपलब्ध करून देईल.

(९) (क) पोट-कलम (८) लागू होत असेल अशी कोणतीही व्यक्ती, जर कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय,त्याची शासकीय कर्तव्ये पार पाडताना कोणत्याही कृतीमुळे किंवा अपकृतीमुळे दोषी असल्याचे आढळून आल्यास, तो अपराधसिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(ख) उपरोक्तप्रमाणे कोणत्याही अशा कृतीच्या किंवा अपकृतीच्या बाबतीत, झालेल्या नुकसानाकरिता अशा कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात,कोणताही दावा किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "पोट-कलम (८) लागू होत असलेल्या व्यक्ती", या संज्ञेत निर्वाचन अधिकारी, सहायक निर्वाचन अधिकारी, पीठासीन अधिकारी, मतदान अधिकारी आणि उमेदवाराचे नामनिर्देशन करणे किंवा उमेदवारी मागे घेणे, किंवा मतदानाच्या ठिकाणाचे चित्रीकरण करणे किंवा मतांची मोजणी करणे यासंबंधातील कोणतेही कर्तव्य बजावण्यासाठी नियुक्त केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्ती असतील ;आणि शासकीय कर्तव्ये या शब्दप्रयोगाचा, अन्वयार्थ तद्नुसार लावण्यात येईल पण या अधिनियमाद्वारे किंवा तद्वये अन्यथा लादण्यात आलेल्या कर्तव्यांचा त्यात समावेश होणार नाही.

(१०) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहिही अंतर्भूत असले तरीही मावळत्या समितीच्या सदस्यांचा पदावधी संपल्यावर तात्काळ नव्याने निवडून झालेल्या समितीच्या सदस्यांना पद ग्रहण करणे शक्य व्हावे म्हणून विद्यमान समितीची मुदत संपण्यापूर्वी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे प्रत्येक संस्थेच्या समितीची निवडणूक घेण्यात येईल.

(११) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, विहित केल्याप्रमाणे व नवीनतम तंत्रज्ञान व विशेषज्ञान यांचा वापर करून कार्यपद्धती, मार्गदर्शक तत्त्वे व रीत यांनुसार संस्थेच्या किंवासंस्थांच्या वर्गाच्या निवडणुका घेईल :

परंतु, शासनास, संस्थेची, संस्थांच्या वर्गाची उद्दिष्टे, कार्यक्षेत्र व व्यवसायांची मानके आणि योग्य व्यवस्थापन व सदस्यांचे हितसंबंध या बाबी विचारात घेऊन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विहित करण्यात येईल अशा रितीने संस्थांचे वर्गीकरण करता येईल.

(१२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सार्वत्रिक निवडणुकीनंतर मंडळ घटित झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत संस्थेच्या उप विधींनुसार निवडून येणे आवश्यक असेल त्याप्रमाणे समितीची आणि अध्यक्ष किंवा कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा उप कार्याध्यक्ष यांच्या पदाची आणि असे इतर पदाधिकारी यांच्या निवडणुका घेईल.

(१३) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या स्तरावर निवडणूक निधी ठेवण्यात येईल. प्रत्येक संस्था, निवडणूक निधीबाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे विहित करण्यात येईल किंवा आवश्यक करण्यात येईल त्याप्रमाणे, तिच्या निवडणुकीवरील अंदाजित खर्चाची रक्कम म्हणून आगाऊ स्वरूपात रक्कम जमा करील. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, उक्त निधीमधून पदाधिकाऱ्याच्या निवडणुकीसह संस्थांची निवडणूक घेण्याकरिता आवश्यक खर्च करेल. निवडणुकीच्या संबंधात अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना, कोणताही असल्यास प्रवास भत्ता, दैनिक भत्ते व पारिश्रमिक यांचे प्रदान करण्यासह कोणतीही निवडणूक घेण्यासाठीचा खर्च उक्त निधीमधून करण्यात येईल आणि हा खर्च विहित केलेल्या रितीने करण्यात येईल. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाद्वारे करण्यात आलेल्या मागणीवरून निबंधक, अशा कोणत्याही संस्थेकडून किंवा संस्थांच्या वर्गाकडून निवडणूक घेण्यासाठीच्या खर्चाची वसुली करेल :

परंतु, कोणतीही संस्था निवडणुकीचा खर्च देण्यास कसूर करीत असेल तर, निबंधकाला देय रकमेची वसुली करण्यासाठी वसुली प्रमाणपत्र काढता येईल आणि अशी रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(१४) प्रत्येक सहकारी संस्थेची समिती ही,—

(क) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला, तिची मुदत संपण्याच्या किमान सहा महिन्यांपूर्वी आपला पदावधी संपण्याबाबत कळवील ;

(ख) समितीमध्ये किंवा तिच्या पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही नैमित्तिक रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कळविल ;

(ग) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विहित केलेल्या दिनदर्शिकेनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला आवश्यक असणाऱ्या अशा नोंदवह्या, अभिलेख आणि माहिती पुरविल ;

(घ) निवडणुका घेण्यासाठी मतदार यादी सुरळीतपणे तयार करण्याकरिता आवश्यक ती सर्व मदत, सहाय्य व सहकार्य पुरवील.

(१५) या अधिनियमामध्ये, नियमांमध्ये किंवा कोणत्याही सहकारी संस्थेच्या उप विधींमध्ये काहिही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३ याच्या प्रारंभाच्या दिनांकास नियत असेल किंवा अशा दिनांकानंतर दिनांक ३१ मार्च २०१३ पर्यंत, नियत होईल, अशी समितीची आणि त्या नंतरची पदाधिकाऱ्यांची निवडणूक ही, दिनांक ३१ डिसेंबर २०१३ पूर्वी घेण्यात येईल.".

२०१३ चा महा.अध्या. २.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये कलम ७३फ दाखल करणे.

**३७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३फ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

संस्थेच्या समितीवरील एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडणूक घेणे.

"**७३फ.** एखाद्या समितीवर एकापेक्षा अधिक जागांवर कोणतीही व्यक्ती निवडून आली असेल त्याबाबतीत, निवडणुकीचे निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत तिने, निवडणूक अधिकारी किंवा यथास्थिति, त्या बाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेला अधिकारी यास स्वतःच्या सहीनिशी लेखी कळवून एक जागा सोडून इतर सर्व जागांचा तिने राजीनामा दिला नसेल तर, या सर्व जागा रिक्त होतील. असा राजीनामा मिळाल्यानंतर किंवा उपरोक्तप्रमाणे जागा रिक्त झाल्यानंतर, निवडणूक अधिकारी, किंवा यथास्थिति, याबाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेला अधिकारी ती रिक्त जागा भरण्याकरिता निवडणुका घेण्याची व्यवस्था करील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याची कलमे ७३फफफ व ७३ग वगळणे.

**३८.** मुख्य अधिनियमाची कलमे ७३फफफ व ७३ग वगळण्यात येतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ७३ज वगळणे.

**३९.** मुख्य अधिनियमाचे कलम ७३ज वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ज नंतर नवीन कलम ७३झ समाविष्ट करणे.

**४०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ज नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

मुदत संपण्यापूर्वी निवडणुका घेण्याबाबत कळविण्याची आणि तिच्या व्यवस्थेसाठी सहाय्य करण्याची समितीची किंवा प्रशासकांची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यांची जबाबदारी.

"**७३झ.** (१) समितीची मुदत संपण्यापूर्वी, कलम ७३गख च्या पोट-कलम (१४) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, तिची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविणे, हे समितीचे कर्तव्य असेल.

(२) समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळविण्यास बुद्धीपुरस्सर कसूर केली असेल तर, आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियमाच्या कलम ७७-अ अन्वये योजिल्याप्रमाणे कारवाई करील.

(३) पोट-कलम (२) अन्वये अशी कारवाई केल्यावर अशाप्रकारे नियुक्त केलेला असा प्राधिकृत अधिकारी, तात्काळ निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला कळवील आणि विनिर्दिष्ट कालावधीत अशी निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करण्याकरिता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला सहाय्य करील."

**४१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७५ मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७५ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

"(एक) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या नियमानुसार त्या संस्थेचे हिशेब पुरे करण्यासाठी नेमलेल्या दिनांकानंतर येणाऱ्या पुढील तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची एक सर्वसाधारण बैठक बोलावील" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल,—

"अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे तिचे कामकाज चालविण्यासाठी, वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आपल्या सदस्यांची अधिमंडळाची वार्षिक बैठक बोलावील" ;

(दोन) पहिले परंतुक वगळण्यात येईल ;

(तीन) दुसऱ्या परंतुकातील, "परंतु, आणखी असे की", या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "बोलाविलेली सर्वसाधारण बैठक असल्याचे समजले जाईल." या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"परंतु, संस्थेने अशी बैठक बोलाविली नसेल याबाबतीत निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास विहित केलेल्या रितीने अशी बैठक बोलविता येईल आणि अशी बैठक ही संस्थेने योग्य रितीने बोलाविलेली सर्वसाधारण बैठक असल्याचे समजले जाईल," ;

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) संस्थेच्या अधिमंडळाच्या प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण बैठकीत, समिती संस्थेसमोर पुढील बाबी ठेवील,—

(एक) समिती सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यास, किंवा कोणत्याही समिती सदस्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास किंवा त्याच्या कुटुंबातील कोणताही सदस्य ज्या संस्थेचा किंवा भागीदारी संस्थेचा किंवा कंपनीचा सदस्य, भागीदार किंवा यथास्थिती संचालक असेल अशी संस्था, भागीदारी संस्था किंवा कंपनी यांस, दिलेल्या कर्जाचा, कोणताही असल्यास—तपशील दर्शविणारे विवरणपत्र ;

(दोन) मागील वर्षामध्ये केलेली कर्जाची परतफेड, त्या वर्षाच्या अखेरीस कर्जाची शिल्लक असलेली रक्कम आणि थकीत रकमा, यांचा तपशील आणि तिच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल ;

(तीन) शिल्लक रकमेच्या विनियोगासाठीची योजना ;

(चार) संस्थेच्या उप विधींमध्ये कोणत्याही सुधारणा केलेल्या असल्यास, त्यांची सूची ;

(पाच) समितीची निवडणूक घेण्याबाबत व तिचे प्रचालन (Conduct) याबाबतचे प्रगटीकरण ;

(सहा) मागील वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षा अहवाल ;

(सात) आधीच्या लेखापरीक्षेचा दुरुस्ती अहवाल ;

(आठ) पुढील वर्षासाठीचा वार्षिक अर्थसंकल्प ;

(नऊ) अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या तरतुदींनुसार, नियमानुसार निबंधकाने मागविलेली इतर कोणतीही माहिती ; आणि

(दहा) उप विधींमध्ये निर्धारित केल्याप्रमाणे आणि ज्यांची रीतसर नोटीस दिली गेली आहे असे इतर कामकाज करण्यात येईल.

**स्पष्टीकरण—एक—**या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता "कुटुंब" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पत्नी, पती, वडील, आई, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून असा आहे ;

**स्पष्टीकरण—दोन—**जी संस्था नफ्यासाठी व्यवहार करीत नसेल, अशा संस्थेच्या बाबतीत, संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण बैठकीत लेखापरीक्षित नफ्या-तोट्याच्या हिशेबाऐवजी लेखापरीक्षित प्राप्तीचा आणि खर्चाचा हिशेब ठेवण्यात येईल आणि या अधिनियमातील लेखापरीक्षित नफ्या-तोट्याचा हिशेबासंबंधीच्या तसेच "नफा" किंवा "तोटा" यासंबंधीच्या सर्व निर्देशांचा अर्थ, अशा संस्थेच्या संबंधात अनुक्रमे "खर्चाहून अधिक झालेली प्राप्ती" आणि "प्राप्तीहून अधिक झालेला खर्च" असा लावण्यात येईल." ;

(ग) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल,—

"(२क) प्रत्येक संस्था, आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधून, कलम ८१ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे किमान अर्हता व अनुभव असणाऱ्या लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या संस्थेची चालू वित्तीय वर्षासाठी नेमणूक करील आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, नेमणूक केलेल्या लेखापरीक्षकाचे नाव आणि संस्थेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठीची त्याची लेखी संमती हे विवरणाच्या स्वरूपात निबंधकाकडे दाखलही करील :

परंतु, एकाच संस्थेच्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकांमध्ये त्याच लेखापरीक्षकाची नेमणूक लागोपाठ तीन वर्षांहून अधिक कालावधीसाठी करण्यात येणार नाही." ;

(घ) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) लेखापरीक्षित ताळेबंद, लेखापरीक्षित नफा आणि तोटा यांचा हिशेब, कलम ८१ अन्वये नेमणूक केलेल्या लेखापरीक्षकाने सादर केलेला, मागील वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षा अहवाल, आधीच्या लेखापरीक्षेचा दुरुस्ती अहवाल आणि समितीचा अहवाल हे, स्वीकृतीसाठी अधिमंडळाच्या प्रत्येक वार्षिक बैठकीत ठेवण्यात येतील आणि उप-विधींमध्ये निर्धारित केल्याप्रमाणे आणि ज्यांची रीतसर नोटीस दिलेली आहे, असे इतर कामकाज करण्यात येईल." ;

(ङ) पोट-कलम (५) मध्ये,—

(एक) "सर्वसाधारण बैठक कालावधी किंवा यथास्थिती, वाढविलेल्या कालावधीत" या मजकुराऐवजी "कालावधीत सर्वसाधारण बैठक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) "पोट-कलमे (२)" हा मजकूर ज्या दोन्ही ठिकाणी आला आहे, तेथे त्याऐवजी "पोट-कलमे (२), (२ क)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) "तीन वर्षांहून अधिक नसलेल्या" या मजकुराऐवजी "पाच वर्षांहून अधिक नसलेल्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) " शंभर रुपयांहून" या मजकूराऐवजी "पाच हजार रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(च) मूळ समासटीपेऐवजी पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

"अधिमंडळाची वार्षिक बैठक."

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक२४ याच्या कलम ७६ची सुधारणा.

**४२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

"विशेष सर्वसाधारण बैठक" या मजकुराऐवजी "अधिमंडळाची विशेष बैठक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) ''तीन वर्षांहून अधिक नसलेल्या'' या मजकुराऐवजी ''पाच वर्षांहून अधिक नसलेल्या'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) ''शंभर रुपयांहून'' या मजकुराऐवजी ''पाच हजार रुपयांहून'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये, ''विशेष सर्वसाधारण बैठक'' या मजकुराऐवजी ''अधिमंडळाची विशेष बैठक'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) मूळ समासटीपेऐवजी पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

''अधिमंडळाची विशेष बैठक.''.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७७-अ ची सुधारणा.

**४३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७-अ मध्ये,—

(क) खंड (ब) मधील ''किंवा यथास्थिती वाढीव पदावधी'' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (ब) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल,—

''(ब-१) समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे ;'';

(ग) खंड (फ) मधील,—

(एक) ''संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या अर्जावरून'' या मजकुराऐवजी ''संस्थेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा सदस्याच्या अर्जावरून'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप खंड (दोन) मधील, ''एक किंवा अधिक प्रशासक'' या मजकुराऐवजी ''एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) दुसऱ्या परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

''परंतु तसेच की, संस्थेचा कोणताही सदस्य किंवा कोणतेही सदस्य अशा समितीवर काम करण्यास इच्छुक नसतील तर, संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी निबंधकाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, संस्थेचा सदस्य नसेल अशा एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकाऱ्यांची नेमणूक करणे हे निबंधकासाठी कायदेशीर असेल.'' ;

(ङ) पोट-कलम (२) मध्ये ''प्रशासकास'' या मजकुराऐवजी ''प्राधिकृत अधिकाऱ्यास'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(च) पोट-कलम (३) मधील,—

(एक) ''प्रशासक'' या मजकुराऐवजी ''प्राधिकृत अधिकारी'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पहिले व दुसरे परंतुक वगळण्यात येईल ;

(तीन) तिसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

''परंतु, कोणत्याही परिस्थितीत, समितीचा किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याचा पदावधी हा त्यांच्या पद धारण केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.'' ;

(छ) पोट-कलम (४) मधील ''प्रशासक'' या मजकुराऐवजी ''प्राधिकृत अधिकारी'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ज) पोट-कलम (५) मधील,—

(एक) ''कलम ७८ पोट-कलम (२क)'' या मजकुराऐवजी ''कलम ७८-अ पोट-कलम (४)'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) ‘‘सदस्यांना किंवा प्रशासकांना’’ या मजकुराऐवजी ‘‘प्राधिकृत अधिकाऱ्यांना’’ हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(झ) समासटीपेऐवजी पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

‘‘समितीच्या सदस्याची नियुक्ती, नवीन समिती, समितीची घटना करीत असतेवेळी कोणताही सदस्य निवडून न येणे व नवीन समितीने पदभार न स्वीकारणे या वेळी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती.’’.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७८ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**४४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

समितीस काम करण्यापासून रोखून ठेवण्याचा अधिकार.

‘‘**७८.** (१). निबंधकाच्या मते, समिती ही तिची कर्तव्ये पार पाडण्यात सतत कसूर करीत असेल किंवा तिची कर्तव्ये पार पाडण्यात निष्काळजीपणा करीत असेल किंवा अन्यथा तिची कामे उचितरीत्या आणि साक्षेपाने पार पाडीत नसेल, किंवा समितीच्या सदस्यांचा राजीनामा, निरर्हता यांमुळे किंवा अन्यथा समितीच्या रचनेत किंवा कार्यात दोष असेल तर, निबंधक, नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, समितीला, कारणे लेखी सादर करण्याची कोणतीही असल्यास, संधी दिल्यानंतर आणि म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर व ती संस्था जिच्याशी संलग्न असेल, त्या संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर, नोटीशीमध्ये नमूद केलेले आरोप सकृतदर्शनी आढळून येत आहेत, परंतु त्यावर उपाययोजना करणे शक्य आहे या निष्कर्षाप्रत आला असेल तर, तो आदेशाद्वारे,—

(एक) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, सहा महिन्यांहून अधिक नसेल अशा तात्पुरत्या कालावधीसाठी अशा समितीला काम करण्यापासून रोखून ठेवू शकेल, आणि

(दोन) संस्थेचा कारभार चालवण्यासाठी, त्या समितीच्या जागी, प्रशासक किंवा संस्थेच्या तीन किंवा अधिक सदस्यांचा–जे अशा प्रकारे रोखून ठेवलेल्या समितीचे सदस्य असणार नाहीत–समावेश असलेली प्रशासकांची समिती नेमू शकेल किंवा प्रशासक किंवा प्रशासकांची–जे संस्थेचे सदस्य असण्याची आवश्यकता नाही–समिती नेमू शकेल :

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट जेथे शासनाने भाग धारण केले नसतील किंवा कोणत्याही रोख रकमेच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे कर्ज किंवा वित्तीय सहाय्य नसेल किंवा शासनाने कोणतीही हमी दिली नसेल तर, अशा संस्थेला लागू होणार नाही:

परंतु आणखी असे की, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँक विनियम अधिनियम, १९४९ याच्या तरतुदीसुद्धा लागू होतील :

परंतु, तसेच, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत या खंडाच्या तरतुदी जणूकाही ‘‘सहा महिन्यांहून’’ या मजकुराऐवजी ‘‘वर्षाहून’’ हा मजकूर दाखल करण्यात आला आहे. असे मानुन लागू होतील : १९४९ चा १०.

परंतु, तसेच या कलमाखाली काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वीसुद्धा, निबंधकाला त्याच्या स्वेच्छाधिकाराने समिती किंवा तिचा कोणताही सदस्य किंवा नेमलेला प्रशासक, बदलण्याचा अधिकार असेल :

परंतु, तसेच, अशी अधिसूचित केलेली राज्य संघीय संस्था, सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत निबंधकाला आपले मत कळविल, असे करण्यास कसूर केल्यास अशा अधिसूचित संघीय संस्थेला काम करण्यापासून रोखून ठेवण्याबाबतच्या आदेशाबद्दल कोणतीही हरकत नाही असे गृहित धरण्यात येईल आणि निबंधकाला त्यानुसार आणखी कार्यवाही सुरू करण्याचे स्वातंत्र्य असेल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (दोन) अन्वये अशाप्रकारे नेमणूक केलेला प्रशासक किंवा यथास्थिती, प्रशासकांची समिती, सुधारात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा

कालावधीत निबंधकाला अहवाल सादर करील आणि अशा अहवालात किंवा अभिलेखात नमूद केलेल्या कोणत्याही महत्त्वपूर्ण बाबींची काळजीपूर्वक तपासणी केल्यानंतर, जर नोटीशीत नमूद करण्यात आलेले दोषारोप सिद्ध झाले किंवा त्यावर सुधारात्मक उपाययोजना केलेली आहे याबाबत निबंधकाची खात्री पटली तर, तो आदेशान्वये निलंबनाचा आदेश मागे घेईल आणि निलंबित केलेल्या समितीकडे तातडीने व्यवस्थापन सोपविण्यासाठी प्रशासकाला किंवा प्रशासकांच्या समितीला निर्देश देईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही समितीविरुद्ध किंवा सदस्याविरुद्ध नोटीस देण्यात आली असेल तेव्हा, समितीने किंवा सदस्याने कोणत्याही पदाचा राजीनामा सादर केला असेल तर तो नोटीस दिल्याच्या दिनांकापासून दोन महिने पूर्ण होईतोवर किंवा ती स्वीकारल्यास निबंधकाकडून परवानगी देण्यात येईपर्यंत, यांपैकी जो कालावधी अगोदरचा असेल त्या कालावधीपर्यंत विधीग्राह्य किंवा परिणात्मक असणार नाही.

(४) अशाप्रकारे नेमण्यात आलेल्या प्रशासकास किंवा प्रशासकांच्या समितीस, निबंधकाच्या नियंत्रणास, आणि तो वेळोवेळी देईल, अशा अनुदेशास अधिन राहून, समितीच्या किंवा संस्थेच्याकोणत्याही अधिकाऱ्याच्या कामांपैकी सर्व किंवा कोणतेही काम पार पाडण्याचा आणि संस्थेच्या हिताच्यादृष्टीने आवश्यक असेल अशी सर्व प्रकारची कारवाई करण्याचा अधिकार असेल आणि तो विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत निवडणूक घेण्याची व्यवस्था करील आणि अधिनियम, नियम व संस्थेचे उपविधी यांनुसार नव्याने निवडून आलेल्या व्यवस्थापन समितीस सोपवील. उपरोक्तप्रमाणे नेमण्यात आलेल्या प्रशासकास किंवा प्रशासकांच्या समितीस, उपविधीत काहीही अंतर्भूत असले तरी, पूर्वीच्या समितीने बोलाविलेल्या सर्वसाधारण बैठकींमध्ये केलेले निर्णय किंवा संमत केलेले ठराव यांचे पुनर्विलोकन किंवा त्यावर पुनर्विचार करण्यासाठी किंवा तिने केलेल्या कारवाईस पुष्टी देण्यासाठी अधिमंडळाची विशेष बैठक बोलविण्याचा अधिकार असेल.

(५) प्रशासकाच्या सेवेच्या शर्ती निबंधकाकडून निश्चित करण्यात येतील, त्यामध्ये त्याला देय असलेल्या परिश्रमिकाचा आणि व्यवस्थापनाच्या खर्चाचा समावेश असेल. निबंधक निश्चित करील अशावेळी व अशा कालांतराने संस्थेच्या निधीतून असे पारिश्रमिक व खर्च देय असेल, आणि जर अशा अवधीत किंवा अशा कालांतराने असे पारिश्रमिक किंवा खर्च देण्यात आला नाही तर, निबंधकास, संस्थेचा निधी ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल त्या व्यक्तीस, जमीन महसूल, जमीन महसुलाची कोणतीही थकबाकी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून संस्थेकडून वसुलीयोग्य असेलेली कोणतीही रक्कम वगळता, अन्य कोणत्याही रकमा देण्यापूर्वी प्रशासकास किंवा प्रशासकांच्या समितीस असे परिश्रमिक आणि असे खर्च प्राथम्याने देण्याविषयी निदेश देता येईल आणि अशी व्यक्ती त्याच्याकडे संस्थेच्या वतीने जमा असलेल्या निधीतून हा खर्च भागविणे शक्य असेल तेथवर निबंधकाच्या आदेशाचे पालन करील.

(६) प्रशासकीय किंवा प्रशासकाच्या समितीने पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या त्यांच्या पदावधीत केलेल्या सर्व कृती व कारवाई ही नवीन समितीवर बंधनकारक असेल.".

**४५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः- सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४ यामध्ये कलम ७८अ समाविष्ट करणे.

"**७८अ.** (१) निबंधकाच्यामते समितीने किंवा अशा समितीच्या कोणताही सदस्याने, संस्थेच्या किंवा तिच्या सदस्यांच्या हितास बाधक होईल अशी कोणतीही कृती केली असेल किंवा राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये निवडणुका घेण्यात कसूर केली असेल किंवा जेथे समिती किंवा अशा समितीचा कोणताही सदस्य तिची किंवा त्याची कार्ये पार पाडण्याचे नाकारित असेल किंवा ती पार पाडणे थांबवले असेल, अशी परिस्थिती उद्‌भवली असेल आणि संस्थेचे कामकाज समितीस निष्प्रभावित करण्याचा किंवा तिच्या सदस्यांना काढून टाकण्याचा अधिकार.

ठप्प झाले असेल किंवा ठप्प होण्याची शक्यता असेल, अथवा जेथे गंभीर वित्तिय नियमबाह्यबाबी किंवा अफरातफरी उघडकीस आल्या असतील किंवा अशा आशयाचे न्यायिक निदेश देण्यात आलेले असतील किंवा जेथे सतत गणपूर्ती होत नसेल तेथे किंवा निबंधकाच्या मते, कलम ७८ च्या पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कारणांवर सुधारात्मक उपाययोजना केल्या नसतील किंवा त्याचे अनुपालन केले नसेल तेथे किंवा जेथे अशा समितीचा कोणताही सदस्य, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखालील समितीचा सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह झाला असेल तेथे, निबंधक, समितीला किंवा यथास्थिती, सदस्याला तिच्या किंवा त्याच्या कोणत्याही आक्षेपांविषयी, कलम ७८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लेखी निवेदन करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर आणि त्याबाबत म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, नोटिशीमध्ये नमूद केलेले दोषारोप सिद्ध झाले आहेत आणि हा अधिनियम नियम व उपविधी यांच्या तरतुदींअन्वये संस्थेचे प्रशासन चालवले जाऊ शकत नाही या निष्कर्षाप्रत आला असेल तर, त्याबाबतची कारणे नमूद करून तो आदेशाद्वारे,—

(क) (एक) समितीस निष्प्रभावित करील, आणि

(दोन) सहा महिन्यांहून अधिक असणार नाही एवढ्या कालावधीसाठी संस्थेचा कारभार चालविण्यासाठी त्या समितीच्या जागी अशाप्रकारे निष्प्रभावित केलेल्या समितीचे सदस्य वगळून तीन किंवा अधिक सदस्यांचा समावेश असलेली समिती किंवा प्रशासक किंवा प्रशासकांची समिती, जे संस्थेचे सभासद असणे आवश्यक नसेल, यांची नियुक्ती करील :

परंतु, या पोट-कलमान्वये काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वीसुद्धा निबंधकाला, समिती किंवा तिचा कोणताही सदस्य अथवा नेमलेला प्रशासक किंवा नेमलेले प्रशासक स्वेच्छाधिकाराने बदलण्याचा अधिकार असेल:

परंतु, आणखी असे की, बँकींग व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँकींग विनियमन अधिनियम, १९४९ च्या तरतुदीसुद्धा लागू होतील आणि अशा संस्थेची समिती, एकावर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी निष्प्रभावित केली जाणार नाही: १९४९ चा १०

परंतु, या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट, जेथे शासनाने भाग धारण केलेले नसतील किंवा रोख रकमेच्या स्वरूपात किंवा अन्य प्रकारे कर्ज किंवा वित्तिय सहाय्य केलेले नसेल किंवा शासनाने कोणतीही हमी दिली नसेल तर, अशा संस्थेला लागू होणार नाही ;

(ख) सदस्याला काढून टाकू शकेल :

परंतु, अशाप्रकारे ज्याला काढून टाकण्यात आलेले असेल तो सदस्य व जिला निष्प्रभावित करण्यात आले असेल अशा समितीचे सर्व सदस्य हे त्यांना ज्या दिनांकास काढून टाकण्यात आले असेल त्या दिनांकापासून समितीच्या पुढच्या एका कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत कोणत्याही संस्थेच्या, कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु, आणखी असे की, बँक व्यवसाय करीत असलेल्या संस्थेच्या बाबतीत, बँकींग विनियमन, अधिनियम, १९४९ याच्या तरतूदीसुद्धा लागू होतील. १९४९ चा १०.

(२) कलम ७८ ची पोट-कलमे (३), (४), (५) व (६) यांच्या तरतूदी या कलमान्वये निष्प्रभावन करण्याच्या किंवा काढून टाकण्याच्या संबंधात, योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७९ ची सुधारणा.

**४६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, ''संस्थेची मत्ता आणि दायित्वे यांबाबत'' या मजकुरानंतर,

''इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील किंवा विहित करण्यात येईल अशा कोणत्याही स्वरुपातील,'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

''(१क) प्रत्येक संस्था, प्रत्येक वित्तिय वर्ष समाप्त होण्याच्या सहा महिन्यांच्या आत तिच्या अशा लेख्यांची संबंधित विवरणपत्रे त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिकडे दाखल करील. विवरणपत्रामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :—

(क) तिच्या कार्यांचा वार्षिक अहवाल ;

(ख) त्याच्या लेखांची लेखापरिक्षित विवरणे ;

(ग) संस्थेच्या अधिमंडळाने,मान्यता दिल्याप्रमाणे शिल्लक रकमेचा विनियोग करण्यासाठीच्या योजना ;

(घ) संस्थेच्या उपविधींच्या सुधारणांची यादी, कोणतीही असल्यास ;

(ङ) नियत असेल तेव्हा तिच्या अधिमंडळाची बैठक घेण्याची आणि निवडणुका घेण्याच्या दिनांका संबंधात प्रतिज्ञापन ;

(च) या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींनुसार निबंधकाला आवश्यक असेल अशी कोणतीही अन्य माहिती.

(१ख) प्रत्येक संस्था अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत अधिमंडळाच्या लेखी संमतीने, तिच्या बैठकीत, राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या नामिकेतून नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकाच्या किंवा लेखा परीक्षण व्यवसय संस्थेच्या नावाशी संबंधित विवरणपत्रे देखील दाखल करील.'' ;

(ग) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) ''कोणत्याही संस्थेस'' या मजकुरानंतर, ''विवरणपत्रे दाखल करण्यास'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) ''पूर्वगामी पोट-कलमान्वये'' या मजकुराऐवजी ''पूर्वगामी पोट-कलमांन्वये'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (३) मध्ये, ''पंचवीस रुपयांहून'' या मजकुराऐवजी ''शंभर रुपयांहून'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

''(४) निबंधक किंवा त्याच्या वतीने प्राधिकृत केलेली व्यक्ती, अशा प्राप्त झालेल्या विवरणांची व माहितीची छाननी करील आणि गरज भासल्यास, आवश्यक ती पुढील कारवाई करील.'';

(च) समास टिपेऐवजी पुढील समासटिप दाखल करण्यात येईल :—

''विवरणे व विवरणपत्रे दाखल करण्याचे संस्थेचे आबंधन व अशी आबंधने पार पाडण्यास फर्माविण्याचा निबंधकाचा अधिकार.''.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७९अ ची सुधारणा.

**४७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९अ मधील पोट-कलम (३) मध्ये,—

(क) खंड (क) मध्ये ''त्या सदस्यास समितीतून काढून टाकता येईल व तिच्या उर्वरित पदावधीसाठी अन्य कोणत्याही व्यक्तीची समितीचा सदस्य म्हणून नेमणूक करता येईल आणि आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी ती व्यक्ती असा सदस्य होण्यास अनर्ह असल्याचे घोषित करता येईल ;'' या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"त्या व्यक्तीस, आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी कोणत्याही संस्थेच्या समितीचा सदस्य असण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्यास अनर्ह घोषित करण्यात येईल";

(ख) खंड (ख) मध्ये,—

(एक) "त्या सदस्यांना काढून टाकून इतर व्यक्तींचा सदस्य म्हणून नेमणूक करता येईल आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, अशी अधिसूचित राज्यसंघीय संस्था, पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, अशा संघीय संस्थेचा या कलमाखालील कारवाई करण्यास कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि त्यानुसार निबंधकास पुढील कारवाई सुरू करण्याची मोकळीक असेल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ७९ब वगळणे.

**४८.** मुख्य अधिनियमाचे कलम ७९ब वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८१ ची सुधारणा.

**४९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८१ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :-

(१)(क) संस्था, प्रत्येक वित्तिय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरिक्षा करवील आणि असे लेखे ज्या आर्थिक वर्षाशी संबंधित असतील त्या आर्थिक वर्षाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या आत आणि कोणत्याही बाबतीत, अधिमंडळाची वार्षिक बैठक घेण्याची नोटीस निर्गमित करण्यापूर्वी, कलम ७५ च्या पोट-कलम (२क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, संस्थेच्या अधिमंडळाकडून नेमण्यात आलेल्या, निबंधकाने तयार केलेल्या व राज्य शासनाने किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या नामिकेवर असणाऱ्या संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यास पात्र ठरण्यासाठी विहित करण्यात येईल अशी आवश्यक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या, लेखापरीक्षकाकडून किंवा लेखापरीक्षक व्यवसाय संस्थेकडून आपल्या लेख्यांचे लेखापरीक्षण पूर्ण करवील आणि ती असा लेखा परीक्षा अहवाल अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीसमोर ठेवील. शिखर संस्थेच्या बाबतीत, लेखापरीक्षा अहवाल विहित करण्यात येईल अशा रीतीने राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर देखील ठेवण्यात येईल :

परंतु, जर निबंधकाची अशी खात्री होईल की, संस्थेने कलम ७५ चे पोट-कलम (२क) आणि कलम ७९ चे पोट-कलम (१ख) याअन्वये तरतूद केल्याप्रमाणे कळविण्यात आणि विवरण दाखल करण्यात कसूर केली आहे, तर ती कारणे लेखी नमूद करून, आदेशाद्वारे, त्यास राज्य शासनाने किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेतील एखाद्या लेखापरीक्षकाकडून तिच्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेता येईल :

परंतु, आणखी असे की, कोणताही लेखापरीक्षक, एक लाख रुपयांपेक्षा कमी भरणा झालेले भाग भांडवल असणाऱ्या संस्था वगळून, एका वित्तिय वर्षात लेखापरिक्षा करण्यासाठी वीस पेक्षा अधिक संस्थांची लेखापरीक्षा स्वीकारणार नाही :

परंतु तसेच की, निबंधक, राज्य शासनाने किंवा त्याने या संबंधात प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने, मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांची व लेखापरीक्षक व्यवसाय संस्थांची नामिका ठेवील ;

(ख) निबंधकाकडून लेखा परीक्षकांची व लेखापरीक्षक व्यवसाय संस्थांची नामिका तयार करण्याची, घोषित व परिरक्षित करण्याची रीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(ग) प्रत्येक संस्थेचे मंडळ, प्राप्ती व प्रदाने किंवा जमा व खर्च, नफा व तोटा आणि ताळेबंद अशा अनुसूचीसह व इतर विवरणपत्रे यासारखी वार्षिक विवरणपत्रे यांची लेखापरीक्षा विहित करण्यात येतीलअशा कालावधीत होईल याची खात्री करील.

(घ) निबंधक, प्रत्येक शिखर सहकारी संस्थेचा लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळाच्यादोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यासाठी राज्य शासनास दरवर्षी विहित करण्यात येईल अशा रीतीने सादर करील.

(ङ) लेखापरीक्षकाच्या अहवालात,—

(एक) लेखापरीक्षेत निदर्शनास आलेले दोष किंवा अनियमितता यांचा सर्व तपशील असेल आणि आर्थिक अनियमितता व निधीचा दुर्विनियोग किंवा अपहार किंवा लबाडी याबाबतीत, लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षक व्यवसाय संस्था अन्वेषण करील आणि कार्यपद्धती, गुंतलेली, सोसविलेली रक्कम याचा अहवाल देईल आणि निधीचा असा दुर्विनियोग किंवा अपहार किंवा लबाडी याबद्दल आवश्यक त्या सर्व पुराव्यांसह समितीचे सदस्य किंवा संस्थेचे कर्मचारी किंवा यथास्थिति, कोणतीही अन्य व्यक्ती यांची जबाबदारी निश्चित करील ;

(दोन) नफा व तोटा यांवरील तद्नुरुप परिणामांसह अहवालात लेख्यांची अनियमितता आणि त्यांच्यावित्तीय विवरणपत्रांवरील अपेक्षित भाराचे तपशीलवार वर्णन केलेले असेल असावे ;

(तीन) संस्थांची, समिती व उप-समित्या यांच्या कामकाजाची तपासणी करणे आणि कोणत्याही अनियमितता किंवा उल्लंघन निदर्शनास आल्यास किंवा कळविण्यात आल्यास, अशा अनियमितता किंवा उल्लंघन यांबद्दल जबाबदारी यथोचितरीत्या निश्चित केलेली असावी.

(च) सहकारी संस्थेचा लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षा करणारी व्यवसाय संस्था यांचे पारिश्रमिक संस्थेकडून देण्यात येईल आणि ते संस्थेचे अधिमंडळ निश्चित करील अशा दराने देण्यात येईल ;

(छ) निबंधक, सहकारी संस्थांची जिल्हानिहाय सूची, कार्यरत संस्थांची सूची, विहित मुदतीत ज्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा झाली असेल अशा संस्थांची सूची, विहित मुदतीत ज्यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा झाली नसेल अशा संस्थांची, त्याबद्दलच्या कारणांसह सूची ठेवील. निबंधक संस्था व लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षक संस्था यांच्याशी समन्वय साधील आणि प्रत्येक वर्षी सर्व संस्थांच्या लेख्यांची लेखापरीक्षा वेळेवर पूर्ण होत असल्याची सुनिश्चिती करील.

**स्पष्टीकरण एक.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, ''आवश्यक अर्हता धारण करणारे लेखापरीक्षक'' राज्य शासनाने किंवा राज्य शासनाकडून यासंबंधात, वेळोवेळी, प्राधिकृत करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्याने, यथोचित मान्यता दिलेल्या नामिकेमध्ये समाविष्ट करण्यासाठी शब्दप्रयोगाचा अर्थ पुढीलप्रमाणे असेल व त्यामध्ये,—

(क) ज्याला संस्थेच्या कामकाजाचे उचित ज्ञान असेल व लेखापरीक्षा करण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव असेल आणि ज्याला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल असा, सनदी लेखापाल अधिनियम, १९४९ याच्या अर्थांतर्गत सनदी लेखापाल याचा समावेश होईल ;

१९४९ चा ३८.

(ख) ''लेखापरीक्षक व्यवसाय संस्था'' याचा अर्थ, जिला संस्थेच्या कामकाजाचे उचित ज्ञान असेल व संस्थांच्या लेखापरीक्षा करण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव असेल आणि मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल,अशी सनदी लेखापाल अधिनियम, १९४९ याच्या अर्थांतर्गत एकापेक्षा अधिक सनदी लेखापालांची व्यवसाय संस्था, असा आहे ;

१९४९ चा ३८.

(ग) ''प्रमाणित लेखापरीक्षक'' याचा अर्थ, जिने मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल आणि तसेच जिने सहकार व लेखाशास्त्र यामधील शासकीय पदविका संपादन केली असेल आणि जिला संस्थांच्या कामकाजाचे उचित ज्ञान असेल व जिला संस्थांच्या लेखापरीक्षा करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असेल आणि मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल, अशी व्यक्ती असा आहे.

(घ) ‘‘शासकीय लेखापरीक्षक’’ याचा अर्थ, ज्याने पदवी किंवा पदव्युत्तर पदवी धारण केली असेल तसेच आणखी सहकार व्यवस्थापनामधील उच्च पदविका किंवा सहकारी लेखापरीक्षा यांमधील पदविका किंवा सहकार व लेखाशास्त्र यांमधील शासकीय पदविका उत्तीर्ण केली असेल आणि ज्याला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल आणि ज्याने परिवीक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला असेल असा, शासनाचा सहकार विभागाचा कर्मचारी, असा आहे.

**स्पष्टीकरण दोन.—**‘‘लेखापरीक्षकांच्या नामिकेमध्ये लेखापरीक्षक म्हणून नावाचा अंतर्भाव करण्यासाठी किंवा धारण करण्यासाठी असलेल्या अटी व शर्ती, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तींच्या अधीन असतील.’’ ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, ‘‘पोट-कलम (१) खालील’’ या मजकुरानंतर पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

‘‘लेखापरीक्षा राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित केलेल्या लेखांकन मानकानुसार पार पाडण्यात येईल आणि तसेच त्या’’ ;

(ग) पोट-कलम (२क) मध्ये, ‘‘सार्वजनिक हिताच्या’’ या मजकुरानंतर ‘‘किंवा संस्थेच्या हिताच्या’’ हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (२ख) मध्ये ‘‘निबंधक, अशा संस्थेची किंवा अशा संस्थावर्गाची लेखापरीक्षा’’ या मजकुराऐवजी ‘‘संस्था आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा’’ हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ङ) पोट-कलम(३) मध्ये,—

(एक) खंड (क) मध्ये ‘‘निबंधकास किंवा प्राधिकृत व्यक्तीस’’ या मजकुराऐवजी ‘‘लेखापरीक्षकास’’ हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ख) मध्ये,—

(क) ‘‘संस्थेची किंवा संस्थांची पुस्तके,’’ या मजकुराअगोदर पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

‘‘लबाडी, निधीचा दुर्विनियोग, खोटे लेखे तयार करणे या गोष्टी दिसून येतात आणि संस्थेच्या लेख्यामध्ये अनधिकृतपणे फेरबदल केले जाण्याची शक्यता आहे, त्यामुळे संस्थेचा तोटा होईल, असे निबंधकास सकारण वाटेल तर,’’;

(ख) ‘‘पुढील कार्यवाही करणे आवश्यक झाल्यास त्या प्रयोजनास्तव वायुवेगी पथकाचा अहवाल हा लेखापरीक्षेचा अहवाल आहे’’ या मजकुराऐवजी ‘‘पुढील कारवाई करण्यासाठी भरारी पथकाचा अहवाल हा पुरेसा पुरावा आहे’’ हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (ग) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

‘‘(ग) लेखापरिक्षकाने सादर केलेल्या लेखापरीक्षा अहवालात लेख्यांचे खरे व अचूक चित्र उघडकीस आणलेले नाही असे निबंधकाच्या निदर्शनास आणून दिले तर, निबंधकास किंवा प्राधिकृत व्यक्तीस अशा संस्थेच्या लेख्यांची चाचणी, लेखापरीक्षा करता येईल किंवा ती करवून घेता येईल. या चाचणी लेखापरिक्षेत, अशा आदेशात निबंधक विहित करील व विनिर्दिष्ट करील अशा बाबींच्या तपासणीचा समावेश असेल.’’ ;

(च) पोट- कलम (५ख) मध्ये,—

(एक) "लेखा परीक्षाविषयक ज्ञापनावर रीतसर सही करून" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"आपला लेखापरीक्षा अहवाल, तो पूर्ण झाल्यापासून एका महिन्याच्या कालावधीच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीची नोटीस देण्यापूर्वी";

(दोन) पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

"परंतु, लेखापरीक्षक आपल्या लेखापरीक्षा अहवालात, कोणतीही व्यक्ती, लेख्यासंबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल किंवा इतर कोणत्याही अपराधाबद्दल दोषी आहे या निष्कर्षापर्यंत आला असेल त्याबाबतीत तो, त्याचा लेखापरीक्षा अहवाल सादर केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे विनिर्दिष्ट अहवाल दाखल करील. संबंधित लेखापरीक्षक निबंधकाची लेखी परवानगी प्राप्त केल्यानंतर, अपराधाचा प्रथम माहिती अहवाल दाखल करील. जो लेखापरीक्षक अपराधाचा प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यास कसूर करील तो अनर्हतेस पात्र ठरेल आणि त्याचे नाव लेखापरीक्षकांच्या नामिकेमधून काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल आणि तो निबंधकास योग्य वाटेल अशा कोणत्याही अन्य कारवाईसदेखील पात्र ठरेल:

परंतु आणखी असे की, लेखापरीक्षकाने वरीलप्रमाणे कारवाई सुरू करण्यात कसूर केली आहे, असे निबंधकाच्या निदर्शनास आणून दिले असेल तेव्हा निबंधक, त्याबाबत प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीकडून अपराधाचा प्रथम माहिती अहवाल दाखल करवील :

परंतु तसेच की, आपल्या लेखापरीक्षेच्या निष्कर्षावरून, लेखापरीक्षकाला असे दिसून येईल की, समितीचे कोणतेही सदस्य किंवा संस्थेचे अधिकारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती यांनी केलेल्या आर्थिक अनियमिततांच्या धडधडीत बाबींमुळे संस्थेचा तोटा झाला असेल तेव्हा तो, विशेष अहवाल तयार करील आणि तो आपल्या लेखापरीक्षा अहवालासह निबंधकाकडे सादर करील. असा विशेष अहवाल दाखल न करण्याची बाब ही त्याच्या कर्तव्यातील निष्काळजीपणा या सदरात जमा होईल आणि तो लेखापरीक्षक म्हणून नियुक्तीसाठी किंवा निबंधकास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही कारवाईस पात्र ठरेल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८२ ची सुधारणा.

**५०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८२ मध्ये ,—

(क) "आणि त्यावर तिने केलेली कार्यवाही निबंधकाला कळवील" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"आणि त्यावर तिने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल निबंधकाला सादर करील आणि तो, अधिमंडळाच्या पुढच्या बैठकीसमोरदेखील ठेवील." ;

(ख) "संबंधित संस्था ही एखाद्या संघीय संस्थेची सदस्य असेल त्याबाबतीत, असा आदेश अशा संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर देण्यात येईल." या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"जी समिती, निबंधकाला आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल सादर करण्यात कसूर करील तर, त्या समितीच्या सर्व सदस्यांनी, कलम १४६ खालील अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ते कलम १४७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र ठरतील. संबंधित संस्था ही संघीय संस्थेची सदस्य असेल त्याबाबतीत, शास्ती लादण्याचे आदेश, संबंधीत अधिसूचित संघीय संस्थेशी विचारविनिमय केल्यानंतर काढण्यात येईल :

परंतु, निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती, त्यानुसार लेखा परीक्षा दुरूस्ती अहवालाची छाननी करील आणि त्या विषयी, दुरुस्ती अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांत अशा अहवालाविषयी संस्थेला कळवील :

परंतु आणखी असे की, संस्था संपूर्ण दुरुस्ती करीपर्यंत, संस्थेच्या दुरुस्ती अहवालावर आपले बाबनिहाय अभिप्राय देणे आणि निबंधकाला आपला अहवाल सादर करणे ही संबंधित लेखा परीक्षकाची जबाबदारी असेल:

परंतु, आणखी असे की, अशी संघिय संस्था, सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, निबंधकाला आपले मत कळवील, तसे न केल्यास, प्रस्तावित कारवाईस अशा संघीय संस्थेचा कोणताही आक्षेप नाही असे गृहित धरण्यात येईल आणि त्यानुसार निबंधकास पुढील कारवाई सुरू करण्याची मोकळीक राहील.''

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८३ ची सुधारणा.

**५१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

''(१) निबंधकास स्वतःहून किंवा संस्थेच्या एक पंचमांश सदस्यांनी केलेल्या अर्जावरुन किंवा कलम ८१ च्या पोट-कलम (५ ख) च्या तिसऱ्या परंतुकाअन्वये विशेष अहवालाच्या आधारे, स्वतःला किंवा याबाबत त्याने यथोचितरित्या लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडून, संस्थेची रचना, तिचे कामकाज आणि तिची आर्थिक स्थिती यांची चौकशी करता येईल.'' ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये,-

(एक) खंड (ख) मध्ये, ''पाचशे रुपयांहून'' या मजकुराऐवजी ''पाच हजार रुपयांहून'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

''(ग) निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, शक्य तेथवर, सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत नऊ महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करील आणि आपला अहवाल सादर करील.''.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८५ ची सुधारणा.

**५२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८५ मधील पोट-कलम (१) मध्ये, ''संस्थे मध्ये संविभाजित करता येईल'' या मजकुरानंतर, ''आणि तो चौकशी अहवाल सादर केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत असा आदेश देईल'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ८८ ची सुधारणा.

**५३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८८ मधील पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

''परंतु, या पोट-कलमाखालील कार्यवाही, निबंधकाने, आदेश काढल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत प्राधिकृत व्यक्ती कडून पूर्ण करण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, निबंधकास त्याबद्दलची कारणे नोंदवून उक्त कालावधी कमाल सहा महिन्यांच्या कालावधीकरिता वाढविता येईल.''.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ८९अ ची सुधारणा.

**५४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८९ अ मध्ये पोट-कलम (१) मध्ये,–

(क) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

''(ग) संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्वांनुसार आणि व्यावसायिक व कार्यक्षम व्यवस्थापनाखाली चालवला जात असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी एकूण आढावा घेण्यात आला आहे ;'';

(ख) खंड (घ) मधील परंतुक वगळण्यात येईल ;

(ग) खंड (घ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ङ) कलम ७९ द्वारे तरतूद केलेली विवरणे निबंधकाला नियमितपणे व योग्य रीतीने सादर करण्यात येतील.".

**५५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८९ अ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये कलम ८९ अब समाविष्ट करणे.

गाऱ्हाणी, समझोता व तक्रार निवारण समिति, तिची रचना, अधिकार, कार्ये, इत्यादी.

"**८९अब.** (१) प्रत्येक संस्थेमध्ये तिच्या कारभाराशी आणि व्यवस्थापनाशी संबंधित, सदस्यांच्या आणि त्या संस्थेच्या गाऱ्हाण्यांवर विचार करण्यासाठी संस्थेच्या सर्वसदस्यमंडळाच्या वार्षिक बैठकीत नियुक्त करावयाची एक गाऱ्हाणे समझोता व निवारण समिती असेल. ही समिती, व्यवहार्य असेल तेथवर, तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत गाऱ्हाण्यांवर सुनावणी आणि समझोता करील. संस्थेची समिती, निबंधकाला अशा गाऱ्हाणी समझोता व निवारण समितीच्या नियुक्तीचा अहवाल सादर करील.

(२) (क) गाऱ्हाणे समझोता व निवारण समितीत संस्थेच्या तीन क्रियाशील सदस्यांचा समावेश असेल, असे क्रियाशील सदस्य हे संस्थेच्या समितीचे सदस्य असणार नाहीत.

(ख) पोट-कलम (१) खालील समितीचा सभापती हा, एक विद्वान आणि संस्थेचा ज्येष्ठ सदस्य असेल ; आणि संस्थेचे इतर दोन सदस्य हे, सर्वसदस्यमंडळास स्वतंत्र व निःपक्षपाती वाटतील असे, प्रामुख्याने संस्थांच्या अशा वर्गातील तज्ज्ञ किंवा अनुभवी सदस्य असतील.

(३) जर कोणत्याही सदस्याचे, माजी सदस्याचे किंवा मृत सदस्याच्या कोणत्याही कायदेशीर प्रतिनिधीचे किंवा संस्थेचे त्या संस्थेच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध कोणतेही गाऱ्हाणे असेल आणि ते पक्षकार समझोत्याने गाऱ्हाणे मिटविण्यास सहमत असतील तर, व्यथित झालेला पक्षकार, तो ज्यांवर अवलंबून असेल अशा दस्तऐवजांसह गाऱ्हाणे समझोता व निवारण समितीकडे लेखी अर्ज सादर करील. असा अर्ज मिळाल्यावर, गाऱ्हाणी समझोता व निवारण समिती एक तारीख निश्चित करील आणि दुसऱ्या पक्षकारास, तो ज्यांवर अवलंबून असेल अशा दस्तऐवजांसह आपले म्हणणे मांडण्यास सांगील आणि सलोख्याने तडजोड करून गाऱ्हाण्याचा समझोता करण्यासाठी बैठकीची एक तारीख निश्चित करील.

(४) गाऱ्हाणी समझोता व निवारण समिती, अधिनियम, नियम व उपविधी यांच्या चौकटीत राहून, पक्षकारांनी आपल्या गाऱ्हाण्यांवर सलोखापूर्ण समझोता करण्याप्रत येण्यासाठी त्यांना स्वतंत्र व निःपक्षपाती रीतीने सहाय्य करील. गाऱ्हाणी समझोता व निवारण समितीस, पक्षकारांमधील गाऱ्हाण्यांवर समझोता करण्यासाठी प्रस्ताव देखील देता येईल किंवा तो तयार करता येईल.

(५) गाऱ्हाणी समझोता आणि निवारण समितीच्या सहाय्याने पक्षकार समझोता करार करण्याप्रत आल्यास, ते समझोता करार तयार करतील. असा समझोता करार विचारात घेतल्यानंतर, गाऱ्हाणी समझोता आणि निवारण समिती, गाऱ्हाणी मिटविणारा अंतिम समझोता करार तयार करील.

(६) जेव्हा अंतिम समझोता करार तयार करण्यात येईल तेव्हा, त्या समझोता करारावर पक्षकार स्वाक्षरी करतील आणि असा समझोता करार पक्षकारांवर आणि त्यांच्यावतीने दावा सांगणाऱ्या व्यक्तींवर बंधनकारक राहील. गाऱ्हाणी समझोता व निवारण समिती, तो समझोता करार अधिप्रमाणित करील आणि त्याची एक प्रत प्रत्येक पक्षकारास देईल. गाऱ्हाणी समझोता व निवारण समिती, या संपूर्ण कार्यवाहीचा अभिलेख ठेवील.

(७) पक्षकारांनी आणि गाऱ्हाणी समझोता व निवारण समितीने स्वाक्षरी केलेला समझोता करार हा त्या समझोत्याचा एक निर्णायक पुरावा असेल.".

**५६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९१ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ९१ ची सुधारणा.

(क) "विनिर्दिष्ट संस्थांच्या समित्या किंवा त्यांचे अधिकारी यांहून अन्य" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) परंतुकामधील, "कलम ७३ एक क खाली अधिसूचित केलेल्या संस्थेहून अन्य कोणत्याही संस्थेचा किंवा कलम ७३ ग अन्वये किंवा त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या" हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ९२ ची सुधारणा.

**५७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९२ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये "ज्याच्या संबंधात ७७ अ किंवा ७८ अन्वये नामनिर्देशित समिती किंवा प्रशासक नेमण्यात आला असेल" या मजकुराऐवजी, "ज्याच्या संबंधात कलमे ७७ अ, ७८ किंवा ७८ अ अन्वये नामनिर्देशित समिती किंवा प्रशासक किंवा समिती किंवा प्राधिकृत व्यक्ती नेमण्यात आली असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि "कलम १०२ किंवा, यथास्थिति, कलमे ७७ अ, ७८ अन्वये ज्या दिनांकास आदेश देण्यात आला असेल त्या दिनांकापासून सहा वर्षे असेल" या मजकुराऐवजी "कलमे ७७ अ, ७८ किंवा ७८ अ किंवा यथास्थिति, कलम १०२ अन्वये ज्या दिनांकास आदेश देण्यात आला असेल त्या दिनांकापासून सहा वर्षे असेल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याचे कलम ९३ ची सुधारणा.

**५८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९३ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, समझोत्याचे घटक पक्षकारांना स्वीकार्य असतील असे समझोत्याचे घटक अस्तित्वात असल्याचे सहकारी न्यायालयास दिसून येईल त्याबाबतीत त्या न्यायालयास, समझोत्याचे मुद्दे तयार करता येतील आणि ते पक्षकारांच्या अभिप्रायासाठी ते त्यांना देता येतील, आणि त्यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर, न्यायालय संभाव्य समझोत्याचे मुद्दे पुन्हा तयार करील आणि तो विवाद,—

(एक) लवाद कार्यवाही ;

(दोन) समेट ;

(तीन) लोक अदालतीमार्फत समझोता यासह न्यायिक समझोता ;

(चार) मध्यस्थी ;

याकरिता निदेशित करील.

(४) विवाद -

(क) लवाद किंवा समेट कार्यवाहीसाठी निर्देशित करण्यात आला असेल त्याबाबतीत लवाद व समेट अधिनियम, १९९६ च्या तरतुदी ह्या जणू काही उक्त अधिनियमाच्या तरतुदींखालील विवाद मिटविण्याकरिता लवाद व समेट कार्यवाही निर्देशित केली होती असे समजून लागू होतील ; १९९६ चा २६.

(ख) लोक अदालत, न्यायालयास, विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ याच्या तरतुदींनुसार तो विवाद लोक अदालतीकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात येईल आणि लोक अदालतीकडे निर्णयार्थ निर्देशित केलेल्या विवादाच्या बाबतीत त्या अधिनियमाच्या इतर सर्व तरतुदी, लागू होतील ; १९८७ चा ३९.

(ग) न्यायिक समझोत्यासाठी, न्यायालयास तो विवाद, या क्षेत्रात काम करणाऱ्या एखाद्या योग्य संस्थेकडे किंवा व्यक्तीकडे निर्णयार्थ निर्देशित करता येईल आणि अशी संस्था किंवा व्यक्ती ही लोक अदालत असल्याचे समजण्यात येईल आणि त्याबाबतीत विधि सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ याच्या सर्व तरतुदी ह्या, जणू काही त्या अधिनियमाच्या तरतुदींन्वये विवाद लोक अदालतीकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात आला होता, असे समजून लागू होतील ; १९८७ चा ३९.

(घ) मध्यस्थीसाठी, न्यायालयास पक्षकारांमध्ये तडजोड घडवून आणता येईल आणि ते विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धत अनुसरील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ९४ ची सुधारणा.

**५९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९४ मध्ये, पोट-कलम (३क) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील, -

"(३-क) जेव्हा विवाद सुनावणीसाठी घेण्यात येईल तेव्हा विवादी हजर असेल आणि विरुद्ध पक्षकार गैरहजर असल्यास, सहकारी न्यायालयास तो विवाद एकतर्फी निर्णीत करता येईल आणि निवाडा देता येईल. जर विरुद्ध पक्षकार अशा निवाड्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सहकारी न्यायालयाकडे

अर्ज करील आणि तो विवाद सुनावणीसाठी घेण्यात आला होता त्यावेळी गैरहजर राहण्यास त्याला पुरेसे कारण होते, अशी तो सहकारी न्यायालयाची खात्री पटवून देईल तर, त्या सहकारी न्यायालयास, योग्य वाटेल असा खर्च न्यायालयाला प्रदान करण्याच्या अटीवर किंवा अन्यथा तो एकतर्फी निर्णय रद्द करता येईल आणि गुणावगुणांवरून त्या विवादाच्या सुनावणीसाठी आणि निर्णयासाठी एक दिवस नेमून देता येईल.

(३ख) जेव्हा प्रकरण सुनावणीसाठी घेण्यात आले असेल तेव्हा विरुद्ध पक्षकार हजर असेल आणि विवादी गैरहजर असेल तर, सहकारी न्यायालयास, त्या कसुरीबद्दल तो विवाद खारीज करता येईल आणि त्यानुसार निवाडा देता येईल. विवादी गैरहजर राहिल्याच्या कसुरीबद्दल ज्या दिनांकास विवाद खारीज करण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, जर तो विवादी सहकारी न्यायालयाकडे अर्ज करील तर, त्या सहकारी न्यायालयास, कसुरीबद्दल खारीज केलेला तो विवाद पुनःस्थापित करता येईल आणि त्यास योग्य वाटेल असा खर्च न्यायालयाला प्रदान करण्याच्या अटीवर किंवा अन्यथा तो विवाद पुनःस्थापित करता येईल आणि गुणावगुणांवरून त्या विवादाच्या सुनावणीसाठी आणि निर्णयासाठी एक दिवस नेमून देता येईल.”.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ९५ ची सुधारणा.

**६०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९५ मधील पोट-कलम (१) मध्ये,–

(क) “कलम ९३ अन्वये किंवा कलम १०५ अन्वये” या मजकुराऐवजी, “कलमे ९१, ९३ किंवा १०५ यांअन्वये” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) “प्राधिकृती व्यक्ती” हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला असेल त्या त्या ठिकाणी “प्राधिकृत अधिकारी” हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ९६ ची सुधारणा.

**६१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९६ मध्ये, “लवादाकडे निर्देशित करण्यात येईल तेव्हा, विवादातील पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर, सहकारी न्यायालय” या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“सहकारी न्यायालयाकडे निर्णयार्थ निर्देशित करण्यात आला असेल तेव्हा त्यास, विवादातील पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर.”.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ९७ ची सुधारणा.

**६२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९७ मध्ये, “प्राधिकृत व्यक्तीने” या मजकुराऐवजी “प्राधिकृत अधिकाऱ्याने” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ९८ ची सुधारणा.

**६३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९८ मध्ये,—

(क) “प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने” या मजकुराऐवजी “प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) “कलम १५४ खाली पुनरीक्षणात” या मजकुराऐवजी, खालील मजकूर दाखल करण्यात येईल:—

“कलम १५४ अन्वये पुनरीक्षणात राज्य शासनाने किंवा निबंधकाने या अधिनियमाखाली वसुलीसाठी दिलेला प्रत्येक आदेश” ;

(ग) परंतुकामध्ये, “त्यासोबत निबंधकाने” या मजकुरानंतर “किंवा सहकारी न्यायालयाने” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १०१ ची सुधारणा.

**६४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०१ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) “सहकारी गृहनिर्माण संस्थेने तिच्या येणे असलेल्या रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी” या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“सहकारी गृहनिर्माण संस्थेने, तिच्या परिरक्षा व सेवा आकाराच्या वसुलीसाठी”;

(दोन) ''एखाद्या नागरी सहकारी बँकेने तिच्या येणे रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी'' या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

''किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तिच्या वैयक्तिक सदस्यांना दिलेल्या कोणत्याही आगाऊ रकमेच्या किंवा कृषीतर सहकारी पतसंस्थेने तिच्या येणे असलेल्या रकमांच्या थकबाकीच्या वसुलीसाठी'' ;

(तीन) ''संबंधित सहकारी संस्थेने थकबाकीच्या संबंधातील लेख्यांचे विवरणपत्र सादर केल्यावर'' या मजकुराऐवजी ''संबंधित सहकारी संस्थेने थकबाकीच्या संबंधातील लेख्यांचे विवरणपत्र आणि विहित करण्यात येतील असे इतर कोणतेही दस्तऐवज सादर केल्यावर'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) विद्यमान स्पष्टीकरणाला ''स्पष्टीकरण-एक'' असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या स्पष्टीकरण-एक नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :-

''**स्पष्टीकरण दोन.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी ''परिरक्षा व सेवा आकार'' या शब्दप्रयोगाचा अर्थ, संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केलेले असतील असे आकार, असा आहे.''

(ख) पोट-कलम (३) मध्ये ''जमीन महसूल वसूल करण्यासाठी त्या त्यावेळी जो कायदा अंमलात असेल त्यास अनुसरून वसूल करण्यायोग्य असेल'' या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

''त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल अशा आदेशाच्या किंवा प्रमाणपत्र देण्याबाबत कलम १५४ अन्वये निर्धारित केलेल्या रीतीने, पुनरिक्षण करता येईल आणि असे प्रमाणपत्र कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद केले जाण्यास पात्र असणार नाही''

(ग) समासटिपेऐवजी, पुढील समासटीप दाखल करण्यात येईल :—

''विवक्षित संस्थांनी देय असलेल्या विवक्षित रकमा आणि थकबाकी, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करणे.''

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १०२ ची सुधारणा.

**६५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०२ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये, ''कलम ८४ अन्वये'' या मजकुरानंतर ''किंवा कलम ८९अ अन्वये'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**६६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ मधील पोट-कलम (१) मध्ये पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

''परंतु आणखी असे की, जर दहा वर्षांच्या अखेरीस परिसमापनाच्या कार्यवाहीच्या समाप्तीमुळे निबंधक या निष्कर्षाप्रत येईल की, परिसमाप कलम १०५ खालील परिसमापकाचे काम त्याच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळे पूर्ण करू शकणार नाही तर, तो परिसमापक अहवाल सादर करण्यास फर्मावील. अहवाल प्राप्त झाल्यानंतर, अजूनही मत्ता, मालमत्ता यांची विक्री करून रोख किंमत वसूल करावयाची राहून गेली असल्याबाबत निबंधकाची खात्री पटली असेल तर, तो, ते संपूर्ण काम पूर्ण करण्याचे आणि समापनाच्या प्रयोजनासाठीच फक्त ती कार्ये पार पाडण्याचे आणि परिसमापकाकडून अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून गणना केलेल्या एका वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीच्या आत आपला अहवाल सादर करील असे परिसमापकाला निदेश देईल.''

**६७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११० क मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११०क ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (तीन) मध्ये "समिती निष्प्रभावित करण्यासाठी (काढून टाकण्यासाठी)" या शब्दाने सुरू होणाऱ्या आणि "त्या पदावर काम करण्याचे चालू ठेवील" या शब्दाने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"समिती निलंबित किंवा यथास्थिती निष्प्रभावित करण्यासाठी आणि एका वर्षापेक्षा अधिक नसलेल्या कालावधीसाठी तिच्याऐवजी प्रशासकाची नेमणूक करण्याचा आदेश देण्यात येईल. समिती निष्प्रभावित करण्याच्या बाबतीत अशाप्रकारे नेमलेला प्रशासक, त्याचा पदावधी संपण्यापूर्वी, नवीन व्यवस्थापन समिती घटित करण्यासाठी निवडणूक घेण्याची व्यवस्था करील आणि ते व्यवस्थापन नव्याने घटित झालेल्या समितीकडे सुपूर्द करील. समिती निलंबित करण्याच्या बाबतीत, निबंधक, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीने निलंबन आदेश रद्द करील आणि ते व्यवस्थापन समितीकडे सुपूर्द करण्यासाठी प्रशासकाला निदेश देईल."

(दोन) खंड (चार) मध्ये, "समिती निष्प्रभावित करण्याचा (काढून टाकण्याचा)" या मजकुराऐवजी "समिती निलंबित किंवा निष्प्रभावित करण्याचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) समासटिपेमध्ये, "तिची समिती" या मजकुरानंतर "निलंबित करणे किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**६८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११२ मध्ये, पोट-कलम (१) मधील "लोकहिताच्या" या मजकुराऐवजी "संस्थेच्या हिताच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११२ ची सुधारणा.

**६९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११२ अ मधील,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११२अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मध्ये,–

(एक) खंड (ब) मध्ये,—

(क) "जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ही पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल, जसे" या मजकुराऐवजी "जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेत पुढील व्यक्तींचा अंतर्भाव असेल,–" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) उप खंड (एक) ऐवजी पुढील उप खंड दाखल करण्यात येईल :—

"(एक) जिल्ह्यातून निवडून देण्यात येतील असे अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्तींमधून एक प्रतिनिधी, इतर मागासवर्गातील व्यक्तींमधून एक प्रतिनिधी, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग यांतील व्यक्तींमधून एक प्रतिनिधी आणि दोन महिला प्रतिनिधी या राखीव प्रवर्गातील प्रतिनिधींसह जिल्ह्यातील तालुक्यांमधून निवडून द्यावयाचे जास्तीत जास्त एकवीस प्रतिनिधी";

(ग) उप खंड (एक-अ) व (दोन) वगळण्यात येतील ;

(दोन) खंड (क) वगळण्यात येईल ;

(तीन) खंड (ड) मध्ये,—

(क) "प्रकरण ११क च्या तरतुदींना अधीन असेल आणि ती त्या प्रकरणान्वये किंवा त्याखाली नेमून देण्यात आलेल्या रीतीने घेण्यात येईल" या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून घेण्यात येईल." ;

(ख) परंतुकामधील "विनिर्दिष्ट केलेल्या" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये, "जिल्हाधिकाऱ्याने" या मजकुराऐवजी "राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४) मध्ये, "विकास बँकेचे पदसिद्ध सदस्य सोडून इतर सदस्यांचा" या मजकुराऐवजी "विकास बँकेच्या सदस्यांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) पोट-कलम (५) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :–

"(५) जर सहकारी, कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या समितीमध्ये सदस्याचे एखादे पद रिक्त झाले असेल तर क्रियाशील सदस्यांच्या ज्या वर्गाच्या बाबतीत, कोणत्याही कारणामुळे रिक्त पद निर्माण झालेले असेल ते रिक्त पद त्याच वर्गातून, भरता येईल." ;

(ङ) पोट-कलम (७) मध्ये,—

(एक) " ७३फफ" या मजकुराऐवजी "७३गक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) "७८" या मजकुरानंतर "७८अ" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ११२ ब ची सुधारणा.

**७०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११२ ब मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (अ) मध्ये, "खंड (क) व (ड)" या मजकुराऐवजी "खंड (ड)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (ब) मध्ये,–

(क) उप-खंड (एक), ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल,—

"(एक) अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्तींमधून एक सदस्य, इतर मागास वर्गातील व्यक्तीमधून एक सदस्य, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग यांमधील व्यक्तीमधून एक सदस्य आणि महिलांमधून दोन सदस्य या पाच राखीव जागांसह सर्व जिल्ह्याच्या अध्यक्षांमधून निवडावयाचे एकवीस सदस्य ;";

(ख) उप खंड (दोन) मध्ये,—

(एक) परिच्छेद (क) व (ख) वगळण्यात येतील ;

(दोन) "जिल्हाधिकारी किंवा त्याने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी बोलाविलेल्या पहिल्या बैठकीमध्ये समितीकडून स्वीकृत करण्यात यावयाचे राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेच्या सदस्यांमधील," या मजकुराऐवजी "राज्य सहकार निवडणूक आयुक्त किंवा राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी बोलविलेल्या पहिल्या बैठकीमध्ये समितीकडून स्वीकृत करण्यात येतील असे राज्य सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेचे सदस्य," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) "आणि जर अशा प्रकारे सदस्याला किंवा सदस्यांना स्वीकृत करून घेण्यात" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि, "सदस्याची किंवा सदस्यांची समितीवर नेमणूक करील" या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात येईल ;

(चार) स्पष्टीकरणामध्ये, "खंड (ब) आणि (क) यांच्या तरतुदी आणि खंड (क) अनुसार काढलेले कोणतेही आदेश", या मजकुराऐवजी "खंड (ब) आणि खंड (ब-१) यांच्या तरतुदी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) उप खंड (तीन), (चार), (पाच) आणि (सहा) आणि (सात) वगळण्यात येतील.

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल.

(ग) पोट-कलम (३) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(३) समितीचा एक सभापती व एक उप सभापती असेल. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी पोट-कलम (१), खंड (ख), उप खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांमधून सभापतीची आणि उप सभापतीची निवड करण्यासाठी समितीच्या सदस्यांची बैठक बोलावील आणि अशा बैठकीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा असा प्राधिकृत अधिकारी अध्यक्षस्थानी राहील, मात्र अशा बैठकीत त्यांना मतदान करण्याचा हक्क असणार नाही." ;

(घ) पोट-कलम (४), (५) आणि (६) वगळण्यात येतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामधील प्रकरण अकरा-अ आणि कलमे १४४-अ ते १४४-वाय वगळणे.

**७१.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण अकरा-अ सह कलमे १४४-अ ते १४४-वाय वगळण्यात येतील.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४६ ची सुधारणा.

**७२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये,—

(क) खंड (ब) मध्ये, "किंवा अभिकर्त्याने" या मजकुरानंतर, "कोणत्याही पुरेशा कारणाशिवाय", त्याच्या कर्मचाऱ्याकडून त्याने कापून घेतलेली रक्कम, अशी वजात करण्यात आल्याच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या कालावधीच्या आत सहकारी संस्थेला प्रदान करण्यात तसेच कोणत्याही व्यक्तीने देखील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (इ-२) मध्ये "कलम ७३फफ" या मजकुराऐवजी "कलम ७३गक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (च) मध्ये, "पोट-कलम (२)" या मजकुरानंतर "(२अ)", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) खंड (ग) मध्ये,—

(एक) पुढील मजकूर सुरूवातीला समाविष्ट करण्यात येईल :—

"सहकारी संस्थेने किंवा तिच्या अधिकाऱ्याने किंवा सदस्याने बुद्धीपुरस्सर खोटे विवरण तयार करणे किंवा या अधिनियमाच्या कलम ७५ किंवा ७९ खालील विवरण देण्यात कसूर करणे किंवा खोटी माहिती सादर करणे किंवा कलम ८३ अन्वये चौकशी करणाऱ्या व्यक्तीला, कलम ८८ अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला अथवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्याच्याकडून मागवलेली कोणतीही माहिती पुरविण्यात बुद्धीपुरस्सर कसूर करणे,";

(दोन) "७८, ८१, ८३, ८४, ९४ किंवा १०३" या मजकुराऐवजी "७७ अ, ७८,७८ अ, ८१,८३,८४,८८, ८९ क, ९४, १०३ किंवा ११०अ" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (ह) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येतील ;

"(ह) कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा परिरक्षकाने तो ज्या सहकारी संस्थेचा अधिकारी किंवा परिरक्षक असेल, त्या सहकारी संस्थेच्या मालकीची पुस्तके, लेखे, कागदपत्रे, अभिलेख, रोख रकमा, रोखे आणि इतर कोणतीही मालमत्ता प्राधिकृत व्यक्तीकडे किंवा कलम ७७ अ, ७८,७८अ, १०३ किंवा ११० अ अन्वये नेमलेल्या व्यक्तीकडे, किंवा या अधिनियमान्वये नेमलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सोपविण्यात कसूर करणे ; किंवा

(ज-१) संस्थेची समिती किंवा तिचा अधिकारी किंवा सदस्य निवडणुकीमध्ये भ्रष्टाचाराच्या व्यवहारात गुंतलेला असणे किंवा" ;

(चार) खंड (ज) च्या, सुरुवातीला पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"कोणत्याही व्यक्तीने, कलम ८१, ८३, ८८ अन्वये, किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींन्वये काढलेले कोणतेही समन्स, अधिग्रहण किंवा कायदेशीर लेखी आदेश यांची बुद्धीपुरस्सर किंवा कोणत्याही वाजवी सबबीशिवाय अवज्ञा करणे ; किंवा" ;

(पाच) खंड (ल) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ल-१) कलम ८२ अनुसार समितीने, निबंधकाला आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत लेखापरीक्षा दुरुस्ती अहवाल सादर करण्यात कसूर करणे ; किंवा".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४७ ची सुधारणा.

**७३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४७ मध्ये,—

(क) खंड (अ) मध्ये "पाचशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये "पाच हजार रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पंधरा हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (क) मध्ये "पाचशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) खंड (ड) मध्ये "पाचशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ङ) खंड (इ) मध्ये "शिक्षा किंवा" या मजकुरानंतर, "दहा हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(च) खंड (इ-१) मध्ये "पाच हजार रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पंधरा हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(छ) खंड (इ-२) मध्ये "पाच हजार रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पंधरा हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ज) खंड (फ) मध्ये "२५० रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(झ) खंड (ग) मध्ये, "पाचशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ञ) खंड (ह) मध्ये "पाचशे रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयापर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ट) खंड (ह) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ह-१) त्या कलमाच्या खंड (ज-१) खालील अपराध असल्यास, पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;";

(ठ) खंड (आय) मध्ये "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ड) खंड (जे) मध्ये "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ढ) खंड (के) मध्ये "दोन हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, " दहा हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ण) खंड (एल) मध्ये "शंभर रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(त) खंड (एल) नंतर पुढील, खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(एल-१) त्या कलमाच्या खंड (एल-१) खालील अपराध असल्यास, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;" ;

(थ) खंड (एम) मध्ये "पाचशे रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(द) खंड (एन) मध्ये "एक हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "पाच हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ध) खंड (ओ) मध्ये "शिक्षा किंवा" या मजकुरानंतर, "दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(न) खंड (पी) मध्ये "शिक्षा किंवा" या मजकुरानंतर, "पंधरा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(प) खंड (क्यू) मध्ये "२५० रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "एक हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५२ ची सुधारणा.

**७४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५२ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु असे की, अपीलकर्त्याद्वारे सोसायटीकडे निवाड्यामध्ये नमूद केलेल्या रकमेच्या पन्नास टक्के रक्कम जमा केल्याखेरीज परिसमापकाद्वारे देण्यात आलेल्या निवाड्याअन्वये येणी वसुलीबाबतचा स्थगिती आदेश देण्यात येणार नाही." ;

(ख) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३क) अपील अधिकाऱ्याला न्यायाची उद्दिष्ट्ये विफल होऊ नये म्हणून आक्षेपित आदेश, प्रलंबित निर्णय व अपिलाची अंतिम सुनावणी यांना स्थगिती देण्याच्या आदेशासह असा अंतरिम आदेश देता येईलः

परंतु असे की, दुसऱ्या बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्याखेरीज अपील प्राधिकाऱ्याने जर कोणताही अंतरिम आदेश दिला असेल तर, अपील प्राधिकारी, तीन महिन्यांच्या कालावधीत अशा अर्जावर निर्णय घेईल आणि म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन व कारणे लेखी नोंदवूनगुणवत्तेवर आधारित आवश्यक ते आदेश देईल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५२अ ची सुधारणा.

**७५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५२अ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील "कलम ७३ग अन्वये किंवा त्याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संस्थेकडून" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (२) मधील "कलम ७३ ग द्वारे किंवा अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या संस्थेच्या बाबतीत," या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "अशा निर्णयावर आणखी अपील किंवा पुनरीक्षण करता येणार नाही" या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"संस्थेच्या बाबतीत, असे अपील राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याकडे दाखल करण्यात येईल आणि असा अधिकारी, ते अपील मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत निकालात काढील आणि या अपिलामध्ये अशा अधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५४ ची सुधारणा.

**७६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५४ मध्ये,—

(क) पोट-कलम (२क) मधील,—

(एक) "कलम १०१ अन्वये निबंधकाने दिलेल्या वसुली प्रमाणपत्राच्या" या मजकुरानंतर, "किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या प्रमाणपत्राच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

"परंतु असे की, जेथे अशा पुनरीक्षणाच्या बाबतीत पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने देय वसुलीला स्थगिती दिली असेल तेथे प्राधिकारी व्यवहार्य असेल तितपत असा पुनरीक्षण अर्ज, शक्य तितक्या लवकर परंतु पहिल्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा उशिरा नसेल इतक्या कालावधीत निकालात काढील." ;

(ख) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः-

"(३क) पुनरीक्षण प्राधिकाऱ्याला, न्यायाची उद्दिष्ट्ये विफल होऊ नये म्हणून आक्षेपित आदेश, प्रलंबित निर्णय व पुनरीक्षण अर्जाची अंतिम सुनावणी यांना स्थगिती देण्याच्या आदेशासह असा अंतरिम आदेश देता येईल :

परंतु दुसऱ्या बाजूचे म्हणणे ऐकल्याशिवाय, पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने जर कोणताही अंतरिम आदेश दिला असेल तर, पुनरीक्षण प्राधिकारी, तीन महिन्यांच्या कालावधीत अशा अर्जावर निर्णय घेईल आणि म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन व कारणे लेखी नोंदवून गुणावगुणानुसार आवश्यक ते आदेश देईल.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५७ ची सुधारणा

**७७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५७ मधील,—

(क) "सहकारी पतसंरचना संस्थेव्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे, राज्य शासनाला, संविधान (सत्याण्णवावी सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या तरतुदींशी सुसंगत असतील अशा, या अधिनियमाची कलमे २६, ७३अ, ७३ अअअ, ७३ब, ७३क, ७३गक, ७३गख, ७३इ, ७५, ७६, ७८, ७८अ, ८१ या खालील तरतुदी किंवा इतर कोणत्याही तरतुदी यांपासून कोणत्याही संस्थेला किंवा संस्थांच्या वर्गाला सूट देता येणार नाही.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १५८ ची सुधारणा.

**७८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५८ मधील "किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये रचना केलेल्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील आणि अशी प्राधिकरणे व जिल्हा परिषदेचे अधिकारी" या मजकुराऐवजी, "एखाद्या अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील आणि अशी प्राधिकरणे व अधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९६२ चा महा. ५.

**७९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६० मधील पोट–कलम (३) मध्ये ''पाचशे रुपयांपर्यंत'' या मजकुराऐवजी, ''पाच हजार रुपयांपर्यंत'' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १६० ची सुधारणा.

**८०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६१ मध्ये,—

(क) ''कलम २१अ च्या पोट-कलम (२) खाली शासकीय अभिहस्तांकिती म्हणून'' या मजकुरानंतर, ''कलम ७३गख ची पोट-कलमे (७) व (८) अन्वये नेमणूक केलेली राज्य सहकार निवडणूक आयुक्त व अधिकारी, कर्मचारी व कर्मचारी वर्ग'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) ''कलम ७७अ किंवा ७८'' या मजकुरानंतर, ''७८अ किंवा कलम ११०अ च्या पोट-कलम (१) चा खंड (तीन)'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ग) ''कलम १४९ खाली सहकारी अपील न्यायालयाचा सदस्य'' या मजकुरानंतर, ''किंवा कलम १५६ अन्वये अधिकार प्रदान केलेला कोणताही अधिकारी'' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १६१ ची सुधारणा.

**८१.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६५ मधील पोट-कलम (२) मध्ये,—

(क) खंड (पाच-क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

''(पाच-क१) प्रशिक्षणाचा व शिक्षणाचा कालावधी आणि असे प्रशिक्षण ज्या कालांतराने देण्यात येईल तो कालांतर ; आणि अधिनियमाच्या कलम २४क अन्वये प्रशिक्षण व शिक्षण निधीमध्ये विविध संस्था ज्या विविध दरांनी अंशदान करतील ते दर विहित करणे ;

(पाच-क२) सदस्यत्वाबाबत एखाद्या सदस्याने संस्थेला करावयाच्या प्रदानाची रक्कम आणि अधिनियमाच्या कलम २४क अन्वये एखाद्या सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केल्याबाबत कळविण्याची रीत विहित करणे ;''

(ख) खंड (बत्तीस) वगळण्यात येईल ;

(ग) खंड (पस्तीस-अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

''(पस्तीस-क) कलम ७३गख अन्वये संस्थांच्या निवडणुकीकरिता कार्यपद्धती विहित करणे, संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणूक प्राधिकरणाला, समितीची निवडणूक घेण्यासाठी सूचना देण्याची व व्यवस्था करण्याची तरतूद करणे, संस्था किंवा संस्थांचे वर्ग यांच्या निवडणुका घेण्यासाठी मतदार याद्या तयार करणे तसेच याच्या प्रयोजनार्थ संस्थांच्या वर्गीकरणासाठीसुद्धा तरतूद करणे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या सेवाशर्ती, पदावधी यांची तरतूद करणे,'' ;

(घ) खंड (पस्तीस-ख) वगळण्यात येईल ;

(ङ) खंड (पस्तीस-घ) वगळण्यात येईल ;

(च) खंड (पस्तीस-घ-१) मधील ''कलम ७३फ(२)'' या मजकुराऐवजी, ''कलम ७३कअ (क-१)'' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(छ) खंड (पस्तीस-घ-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

''(पस्तीस-घ-२) वापर करावयाच्या अद्ययावत तंत्रज्ञानासह निवडणुका घेण्याची कार्यपद्धती व रीत आणि निवडणुकांच्या प्रयोजनार्थ संस्थांचे वर्गीकरण करण्याची रीत आणि अधिनियमाच्या कलम ७३गख (१), (४) व (११) अन्वये राज्य सहकारी निवडणूक आयुक्ताच्या सेवाशर्ती विहित करणे ;'';

(ज) खंड (पंचेचाळीस) मधील मजकुराच्या शेवटी, पुढील मजकुर समाविष्ट करण्यात येईल :—

''संस्था किंवा संस्थांचा वर्ग यांनी इलेक्ट्रॉनिक नमुन्यासह ज्या नमुन्यात लेखे व पुस्तके ठेवावयाचे तो नमुना विहित करणे ;'' ;

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १६५ ची सुधारणा.

(छ) खंड (सत्तेचाळीस) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(सत्तेचाळीस) कलमे ७५ व ८१ अन्वये लेखा परीक्षकांची नेमणूक करण्याकरिता ; राज्य विधानमंडळासमोर शिखर संस्थांचे लेखापरीक्षा अहवाल मांडण्याकरिता ; लेखापरीक्षकांची अर्हता, अनुभव व अनर्हता यांची मानके ; आणि लेखापरीक्षा अहवालाचा नमुना याकरिता, कार्यपद्धती विहित करणे,";

(झ) खंड (त्रेपन्न) मधील मजकुराच्या शेवटी, पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

"कलम ९३(४) अन्वये मध्यस्थीने तडजोड करण्यासाठी विवाद हस्तांतरित करण्याची कार्यपद्धती विहित करणे ;";

(ञ) खंड (एकोणसाठ-अ) मधील मजकुराच्या शेवटी, पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :-

"लेखा विवरणपत्र व अन्य दस्तऐवज यांचे नमुने विहित करणे ;";

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १६६ ची सुधारणा.

**८२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६६ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(४) महाराष्ट्र सहाकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु कलम ७३गख च्या पोट-कलम (१५) च्या तरतुदींना अधीन राहून, ३१ मार्च २०१३ नंतर ज्या समित्यांच्या निवडणुका होणार आहेत त्या समित्या, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये अशा संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत किंवा त्यांची मुदत संपेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुढे चालू राहतील. प्रशासकाचे, परिसमापकाचे किंवा निबंधकाचे सर्व आदेश हे जणू काही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या या अधिनियमाअन्वये असे आदेश काढण्यात आले आहेत असे मानून अशा आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीकरिता अंमलात असण्याचे चालू राहतील. या अधिनियमाच्या तरतुदींन्वये निबंधक, त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती, परिसमापक अथवा अन्य कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी किंवा न्यायालय यांच्यापुढे प्रलंबित असलेली सर्व कार्यवाही, जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये निबंधकाकडे किंवा कोणत्याही तत्सम अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे किंवा न्यायालयाकडे हस्तांतरित होतील आणि उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, अशा निबंधकाकडून, अधिकाऱ्याकडून, प्राधिकाऱ्याकडून अथवा न्यायालयाकडून पुढे चालविल्या जातील किंवा निकालात काढल्या जातील: २०१३ चा महा. अध्या. २.

परंतु, संस्थेची अशी कोणतीही समिती ही, नवनिर्वाचित समिती पदभार ग्रहण करेपर्यंत आपले कामकाज पुढे चालू ठेवील.".

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये नवीन कलम १६८ समाविष्ट करणे.

**८३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

अडचणी दूर करण्याचा अधिकार

"**१६८.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३ याद्वारे सुधारणा केलेल्या, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास ती अडचण दूर करण्याकरिता आवश्यक वाटतील अशा, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येतील. २०१३ चा महा. अध्या. २.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.".

## निवेदन

भारताचे संविधान यात सहकारी संस्थांविषयक नवीन भाग नऊ-ख समाविष्ट करण्याच्या उद्देशाने संविधान (सत्याण्णवावी सुधारणा) अधिनियम, २०११ द्वारे त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. उक्त सत्याण्णवाव्या सुधारणा अधिनियमाद्वारे, सहकारी संस्था निर्माण करण्याचा हक्क हा मूलभूत हक्कम्हणून विधिसंस्थापित करण्यासाठी, संविधानाच्या अनुच्छेद १९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सहकारी संस्था स्वेच्छेने स्थापन करणे, त्या स्वायत्त असणे आणि त्यांचे लोकशाही पद्धतीने नियंत्रण आणि व्यावसायिक व्यवस्थापन यास चालना देण्यासाठी राज्याने प्रयत्नशील असावे अशी तरतूद करण्याकरिता संविधानाच्या भाग-चार मध्ये नवीन अनुच्छेद ४३-ख समाविष्ट करण्यात आला आहे. संविधानामध्ये उक्त सत्याण्णवाव्या सुधारणा अधिनियमाद्वारे समाविष्ट करण्यात आलेल्या अनुच्छेद २४३-यन मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, उक्त सत्याण्णवाव्या सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, राज्यातील सहकारी संस्थाविषयक कायद्यातील कोणतीही तरतूद, संविधानात नव्याने समाविष्ट केलेल्या उक्त भाग नऊ-ख मधील तरतुदींशी विसंगत असेल तर, विधानमंडळाने त्यात सुधारणा करेपर्यंत किंवा निरसित करेपर्यंत अथवा अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाचा कालावधी समाप्त होईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील, उक्त संविधान (सत्याण्णवावी सुधारणा) अधिनियम, २०११ हा दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ रोजी अंमलात आला आहे.

२. त्यानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा.२४) हा उक्त सत्याण्णवाव्या सुधारणा अधिनियमाशी अनुरुप करण्यासाठी त्यात सुधारणा करण्याचे प्रस्तवित आहे.

३. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची कमाल संख्या ही एकवीस असेल व त्यांपैकी राखून ठेवलेल्या इतर जागांसह दोन जागा महिलांकरिता राखून ठेवण्यात येतील, अशी तरतूद करणे ;

(दोन) समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी त्यांच्या निर्वाचनाच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल, अशी तरतूद करणे ;

(तीन) संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, नियंत्रण व निवडणुका घेणे यांकरिता ज्याच्याकडे अधिकार निहित असतील असे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण स्थापन करण्याकरिता तरतूद करणे ;

(चार) समितीचा पदावधी तिच्या मूळ पदावधीच्या निम्म्यापेक्षा कमी असेल तर, नामनिर्देशनाद्वारे नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी तरतूद करणे ;

(पाच) तज्ज्ञ संचालक व कार्य संचालक स्वीकृत करून घेण्याकरिता तरतूद करणे ;

(सहा) जर शासनाने एखाद्या संस्थेचे समभाग धारण केलेले असतील अथवा कोणतेही कर्ज किंवा वित्तीय सहाय्य दिलेले असेल किंवा कोणतीही हमी दिलेली असेल तर, विशिष्ट परिस्थितीत, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता त्या संस्थेच्या समितीचे कामकाज तात्पुरते रोखण्यासाठी, अथवा तिचे निष्प्रभावन करण्याकरिता तरतूद करणे, सहकारी बँकांच्या बाबतीत असा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक नसेल.

(सात) शासनाने किंवा त्यांच्याद्वारे प्राधिकृत केलेल्या प्राधिकाऱ्याने, मान्यता दिलेल्या नामिकेमधून, सहकारी संस्थेच्या अधिमंडळाद्वारे नियुक्त केलेला लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षणव्यवसायी संस्था यांच्याकडून, प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा संस्थेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी तरतूद करणे ;

(आठ) वित्तीय वर्षाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या आत प्रत्येक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी तरतूद करणे ;

(नऊ) लवाद किंवा समेट याद्वारे आणि लोकअदालतिच्या मध्यस्थीने विवाद मिटविण्यासाठी आणि गा-हाण्यांचा समझोता करण्यासाठी गा-हाणी समझोता व निवारण समित्यांची नेमणूक करण्यासाठी तरतूद करणे ;

(दहा) बँक व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांच्या बाबतीत, बँक विनियमन अधिनियम, १९४९ याच्या तरतुदींदेखील लागू होतील, अशी तरतूद करणे.

४. राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४), यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १४ फेब्रुवारी २०१३.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजगोपाल देवरा,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.